रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
वर्ष १७ • अंक ८७
www.ramprahar.com
रविवार, १३ ऑक्टोबर २०२४ • पाने ८ • किंमत ₹२

## कोकणातील खाडी पुलांचे आज भूमिपूजन, उद्घाटन



**मुंबई** : सायन-पनवेल महामार्गावरील ठाणे खाडी पूल क्र. ३च्या मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या उत्तरवाहिनी मार्गिकेचे उद्घाटन आणि रेवस (रायगड) ते रेडी (सिंधुदुर्ग) या सागरी महामार्गावरील सात खाडीपुलांच्या कामाचे भूमिपूजन रविवारी (दि. १३) सकाळी ११ वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे होणार आहे. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)मंत्री दादाजी भुसे उपस्थित राहणार आहेत. या वेळी रेवस-करंजादरम्यान धरमतर खाडीवरील पूल, रेवदंडा-साळावदरम्यान कुंडलिका खाडीवरील पूल, दिघी-आगरदांडादरम्यान आगरदांडा खाडीवरील पूल, बागमांडला- वेश्वीदरम्यान बाणकोट खाडीवरील पूल, केळशी खाडीवरील पूल, जयगड खाडीवरील पूल आणि कुणकेश्वर येथील पुलाच्या कामाचे भूमिपूजन होणार आहे.

### अंतरंग

भ्रष्ट अधिकाऱ्यांना पंतप्रधान मोदी दाखवणार घरचा रस्ता/२
पेणमध्ये परतीच्या पावसामुळे भातकापणीची कामे ठप्प/५
विरोधकांच्या अपप्रचाराला बळी पडू नका -आमदार दळवी/७

# विविध मेळाव्यांनी दसरा गाजला

## मला हलक्यात घेऊ नका; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरेंना इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

विजयादशमीनिमित्त मुंबईत शनिवारी (दि. १२) दोन्ही शिवसेनेचे दसरा मेळावे झाले. यातील आझाद मैदानावर झालेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मेळाव्यात त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आणि आनंद दिघेंचा चेला आहे. मला हलक्यात घेऊ नका, असा इशारा त्यांनी दिला.


दसरा मेळाव्यात शिवसैनिकांना संबोधित करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरुवातीलाच उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. ते उद्धव ठाकरेंचे नाव न घेता म्हणाले की, काहींना हिंदू म्हणून घेण्याची लाज वाटत आहे. हिऱ्यापोटी जन्माला आलेल्या गारगोट्यांना हिंदू शब्दाची लाज वाटतेय.



मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, महाराष्ट्र विरोधी आघाडीला घरी बसवून आपले सरकार आले तेव्हा हे सरकार काही दिवसांत पडेल, एका महिन्यात पडेल, सहा महिन्यांत पडेल असे दावे केले जात होते, पण टीका करणाऱ्यांना हा एकनाथ शिंदे पुरून उरला. जनतेच्या आणि तुमच्या आशीर्वादाने व साथीने या सरकारने घासून, पुसून नाही तर ठासून दोन वर्षे पूर्ण केली.

बाळासाहेबांचे विचार घेऊन आम्ही निघालो आहोत. आज महाराष्ट्रात जिथे जिथे जातो, तिथे सगळे जण हसत स्वागत करतात, आशीर्वाद देतात. हेच आपण कमावले आहे. दोन वर्षांच्या अगदी कमी काळात आपले सरकार लाडके सरकार झाले आहे, असा दावाही मुख्यमंत्री शिंदे यांनी केला.

### भारत सर्व क्षेत्रांमध्ये पुढे जातोय -सरसंघचालक मोहन भागवत



**नागपूर** : शतकोत्तर वर्षात पदार्पण करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव मोठ्या उत्साहात झाला. या वेळी मार्गदर्शन करताना सरसंघचालक मोहन भागवग यांनी, आपल्या देशाचा विचार करता तो सर्व क्षेत्रांमध्ये पुढे जात आहे. समाजाची समजही वाढत आहे. जम्मू-काश्मीरच्या निवडणुकाही शांततेत पार पडल्या. याचाच परिणाम म्हणून जगभरात भारताची प्रतिष्ठा वाढली आहे. वसुधैव कुटुंबकम् हा आपला विचार सगळ्यांना मान्य आहे, असे नमूद केले. या मेळाव्याला 'इस्रो'चे माजी प्रमुख डॉ. कोपिल्लिल राधाकृष्णन उपस्थित होते. त्यांनीही मनोगत व्यक्त केले. **(संबंधित वृत्त पान २ वर..)**

### मराठा समाजाच्या सगळ्या मागण्या मान्य करा -मनोज जरांगे



**बीड** : मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी श्री क्षेत्र नारायणगडावरून समाजबांधवांना संबोधित केले. शासनाने निवडणुकीची आचारसंहिता लागायच्या आत आमच्या सगळ्या मागण्या पूर्ण कराव्यात, असे ते म्हणाले. मी कधीच समाजाच्या शब्दाच्या पुढे जाणार नाही. तुमचं हित सोडून काम करणार नाही हा माझ्याकडून तुम्हाला शब्द आहे, असे सांगून आचारसंहितेनंतर मुख्य भूमिका जाहीर करणार असल्याचे जरांगे यांनी या वेळी स्पष्ट केले.

### आगामी निवडणुकीत मतदारांनी आपली भूमिका बजवावी -राज ठाकरे



**मुंबई** : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पॉडकास्टद्वारे जनतेशी संवाद साधला. मी महाराष्ट्राचे गेल्या अनेक वर्षांपासून स्वप्न पाहत आहेत. जगाला हेवा वाटावा असा महाराष्ट्र बनवणे हेच माझे स्वप्न आहे. निवडणुकीत तुम्ही मतदारांनी क्रांती केली पाहिजे. मी उद्या आपला मेळाव्यातून सविस्तर बोलेन, असे त्यांनी म्हटले. राज यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शतकोत्तर वर्षात पदार्पण केल्याबद्दल कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.

### ऊसतोड कामगारांचे जीवनमान बदलणार -आमदार पंकजा मुंडे



**बीड** : तुम्ही मला जिंकवून इज्जत दिली. माझा पराभव झाल्यानंतर त्याहून इज्जत दिली. मी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात येणार आहे. ऊसतोड कामगारांचे जीवन बदलल्याशिवाय शेवटचा श्वास घेणार नाही, असे उद्गार आमदार पंकजा मुंडे यांनी भगवानगडावरून बोलताना काढले. मैं गोपीनाथ मुंडे की बेटी हू, असे म्हणत त्यांनी भाषणाला सुरुवात केली. त्या म्हणाल्या की, मला गोपीनाथ मुंडे यांनी वारसा दिला. मला येथील जनता जास्त प्रिय आहे. या सर्व लोकांवर मी माझ्या लेकरांपेक्षा जास्त जीव लावते.

# पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता करावरील शास्ती माफ

## आमदार प्रशांत ठाकूर यांची माहिती; विविध विकासकामांचे भूमिपूजन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

फोरम, फेडरेशन यांच्या दिशाभूलीमुळे पनवेल महापालिका हद्दीतील काही मालमत्ता करधारकांची फसवणूक होऊन त्यांना शास्ती (दंड) लागली होती. अशा प्रकारची शास्ती माफ व्हावी यासाठी आम्ही महापालिका, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार श्रीरंग बारणे यांना पत्र दिले होते. मुख्यमंत्र्यांनी ही शास्ती माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे खारघरवासीयांसह पनवेल महापालिका हद्दीतील नागरिकांना दिलासा मिळाला आहे, अशी महत्त्वपूर्ण माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली.

पनवेल महापालिकेच्या ८४ कोटींच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन शुक्रवारी (दि. ११) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. पनवेलजवळ होत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे विकासाच्या



अनेक संधी निर्माण होणार आहेत. यातून आपल्या परिसरातील युवकांना रोजगार-स्वयंरोजगार उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. विकासाबद्दल तसेच मालमत्ता करावरील शास्ती माफ केल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार आणि महायुती सरकारचे अभिनंदन केले व आभार मानले.

विकासकामांच्या भूमिपूजन सोहळ्यास महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, हरेश केणी, प्रवीण पाटील, नरेश ठाकूर, शत्रुघ्न काकडे, निलेश बाविस्कर, भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, कीर्ती नवघरे, वासुदेव पाटील, अमर उपाध्याय, युवा मोर्चा खारघर शहर अध्यक्ष नितेश पाटील, समीर कदम, भाजप महिला मोर्चा खारघर शहर अध्यक्ष साधना पवार, उपायुक्त कैलास गावडे, वैभव विधाते, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त स्मिता काळे, रूपाली माने, सुबोध ठाणेकर, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, उपअभियंता विलास चव्हाण, राजेश कर्डिले यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## निवडक

### गुजरातमध्ये भिंत कोसळून सात मजुरांचा मृत्यू

**मेहसाणा** : गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यात कडी तालुक्यातील जसलपूर गावाजवळ शनिवारी (दि. १२) भिंत कोसळून अनेक लोक ढिगाऱ्याखाली गाडले गेले. या दुर्घटनेत सात मजुरांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार येथे एका कारखान्यासाठी भूमिगत टाकी बसविण्याचे काम सुरू होते. त्या वेळी ही दुर्घटना घडली. याबाबत माहिती मिळताच स्थानिक प्रशासनाचे पथक तातडीने घटनास्थळी पोहचले आणि मदतकार्य सुरू झाले.

### काँग्रेस आमदार सुलभा खोडके यांचे सहा वर्षांसाठी निलंबन

**मुंबई** : काँग्रेसच्या अमरावती विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदार सुलभा खोडके यांना पक्षाने सहा वर्षांसाठी निलंबित केले आहे. पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत काँग्रेसचे राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या आदेशावरून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ही कारवाई केली आहे. दरम्यान, आमदार खोडके या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा आहेत.

# पनवेल मतदारसंघात विकासाचा वारू वेगात

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विविध कामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघात विकासाचा धडाका सुरू आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यापूर्ण पाठपुराव्यामुळे आणि निधीमधून ग्रामीण भागातील सुमारे दोन कोटी ३० लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ११) करण्यात आला.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे ५० लाख रुपयांच्या एमएमआरडीए निधी अंतर्गत शिवणसई येथे अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण, एक कोटी रुपयांच्या एमएमआरडीए निधीतून दुंदरे गाव अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण, ५० लाखांच्या निधीतून वाकडी गावातील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण, १० लाख रुपयांच्या निधीमधून भानघरमध्ये गणेश घाटाचे बांधकाम तसेच २०





लाख रुपयांच्या निधीतून हरिग्राम गाव अंतर्गत रस्ता आणि गोपाळ ठाकरे ते विश्वास म्हात्रे यांच्या घरापर्यंतचा रस्ता तयार करण्यात येणार आहे. या कामांचे भूमिपूजन भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या समारंभांना भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, एकनाथ देशेकर, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी सरपंच नरेश पाटील, रमेश पाटील, अनुराधा वाघमारे, विष्णू वाघमारे, लक्ष्मण हिलम, गजानन हिलम, बाळू हिलम, मनोहर पवार, शंकर पवार, विठ्ठल पाटील, काळूराम पाटील, मनीषा वाघमारे, रेखा हिलम, तुळसा हिलम, लीला कातकरी, अशोक वाघमारे, अशोक पवार, संदेश पालांडे, मनोज वाघमारे, रमेश पाटील, शेवंता वाघमारे, लक्ष्मी वाघमारे, सुगंधा कातकरी, चंद्रकांत वाघमारे, विनोद पाटील, शुभम साई, ग्रामपंचायत सदस्य ललिता चौधरी, राणी सिनारे, माजी उपसरपंच किशोर पाटील, भाऊबुवा सिनारे, नाना पाटील, अमर पाटील, महिंद्र सिनारे, रूपेश पाटील, राजेश चौधरी, महेंद्र सिनारे, उपसरपंच विश्वास म्हात्रे, **(पान २ वर..)**

# राज्यातील होमगार्ड्सच्या मानधनात दुप्पट वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

पोलिसांच्या बरोबरीने राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी होमगार्ड महत्त्वाची भूमिका बजावत असतात. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दसऱ्याच्या मुहूर्तावर होमगार्ड्सच्या मानधनात दुप्पट वाढ केली आहे.

याबाबत एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये गृहमंत्री फडणवीस यांनी म्हटले, की राज्यातील होमगार्ड्सचे मानधन जवळजवळ दुप्पट करण्यासंबंधीचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे. प्रतिदिन ५७० रुपयांवरून ते आता १०८३ रुपये इतके करण्यात आले आहे. आता हे मानधन देशात सर्वाधिक आहे. याशिवाय विविध भत्त्यांची रक्कमसुद्धा दुप्पट करण्यात आली आहे. उपहार भत्ता १०० वरून २०० रुपये, तर भोजन भत्ता १००वरून २५० रुपये इतका करण्यात आला आहे. राज्यातील



सुमारे ५५ हजार होमगार्ड्सना या निर्णयाचा लाभ मिळेल. १ ऑक्टोबरपासून ही वाढ देण्यात येईल. गेल्याच महिन्यात सुमारे ११,२०७ होमगार्ड्सची भरती प्रक्रियासुद्धा पूर्ण करण्यात आली आहे. सध्या त्यांचे प्रशिक्षण करण्यात येते आहे. सर्वांना विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा!

१ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत तब्बल ३८ महत्वाचे निर्णय घेण्यात आले होते. या बैठकीत राज्यातील होमगार्ड यांच्या भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.


# रोह्यात आज धावीर महाराजांचा पालखी सोहळा

**धाटाव : प्रतिनिधी**

श्री धावीर महाराज की जयऽऽ च्या घोषाने रोहा नगरी रविवारी (दि. १४) दुमदुमून जाणार आहे. निमित्त आहे पालखी सोहळ्याचे. परंपरेनुसार पोलिसांनी सशस्त्र मानवंदना दिल्यानंतर वाजतगाजत पालखी सोहळ्याचा शुभारंभ होणार असून हा सोहळा २८ तास चालेल.

पालखीच्या स्वागतासाठी रोहेकर सज्ज झाले असून या संपूर्ण सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. दरवर्षी पालखीला होणाऱ्या प्रचंड गर्दीच्या पार्श्वभूमीवर ट्रस्टने यंदा मंदिरासमोरील प्रांगणाचा विस्तार केला असल्याने आता सर्व भक्तांना पोलिसांची सशस्त्र सलामी विनासायास पहाता येणार आहे. शासनाच्या वतीने प्रथमच सहभागी होणारे पोलिसांचे बँड पथक या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असणार आहे.

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रसिद्ध असलेल्या रोह्यातील श्री धावीर महाराजांचा पालखी



### पोलीस देणार सशस्त्र मानवंदना

सोहळा १८६२पासून साजरा केला जातो. ब्रिटिश काळापासून चालत आलेली शासकीय मानवंदना आणि श्री धावीर महाराजांचा उल्लेख असलेली लेखी सनद खुद्द ग्रेट ब्रिटनच्या महाराणी व्हिक्टोरिया यांनी १८६४ साली दिलेली आहे.

यंदा श्री धावीर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे १६२वे वर्ष आहे. दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी परंपरेनुसार आपल्या भक्तांना भेटण्यासाठी धावीर महाराज पालखीतून गाव प्रदक्षिणा करतात. महाराजांवर हजारो भक्तांची मोठी श्रद्धा असून त्यांच्या दर्शनाची आस प्रत्येकाला लागली आहे. ब्रिटिशांच्या काळापासून पोलिसांची सशस्त्र मानवंदना देण्याची परंपरा सुरू झाली ती अजूनही पाळण्यात येते.

रोह्यातील सर्व मंदिरे धावीर महाराजांच्या भेटीसाठी भगव्या पताकांनी तसेच आकर्षक फुलांनी सजली आहेत. चौकाचौकात महाराजांच्या स्वागतासाठी भव्य कमानी उभारल्या असून तयारी करण्यात आली आहे. रविवारी सकाळी नगर प्रदक्षिणेला सुरुवात होणार आहे. २८ तासांनंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी सकाळी पालखी देवस्थानच्या प्रांगणात परतेल.

# संजू-सूर्याचे वादळ; टीम इंडियाचा धावांचा डोंगर



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

बांगलादेशविरुद्ध झालेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या टी-२० सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना २९७ धावांचा डोंगर उभारला. या सामन्यात सलामीवीर अभिषेक शर्मा लवकर बाद झाल्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव आणि संजू सॅमसन यांनी षटकार-चौकारांची आतषबाजी केली.

संजूने शतकी खेळी (४७ चेंडूत आठ षटकारांसह ११ चौकारांसह १११ धावा) आणि सूर्याने अर्धशतकी (३५ चेंडूत पाच षटकार आणि आठ चौकारांसह ७५ धावा) खेळी केली. संजूने कर्णधार सूर्यकुमारसोबत दुसऱ्या विकेटसाठी १७३ धावांची भागीदारी केली.

संजू आणि सूर्या बाद झाल्यानंतर हार्दिक पांड्या (१८ चेंडूत चार चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ४७ धावा) आणि रियान पराग (१३ चेंडूत एक चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ३४ धावा) यांनी अवघ्या २६ चेंडूत ७० धावा जोडून भारताची धावसंख्या ३००च्या जवळ नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, तर रिंकू सिंग चार चेंडूत एका षटकाराच्या मदतीने आठ धावा करून नाबाद माघारी परतला. या दरम्यान भारतीय खेळाडूंनी २५ चौकार आणि २२ षटकार मारले.

बांगलादेशकडून तनझिम हसन शाकिबने चार षटकांत ६६ धावा देत तीन बळी घेतले, तर तस्किन अहमद, मुस्तफिजुर रहमान आणि महमुदुल्लाह यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

# भ्रष्ट अधिकाऱ्यांना पंतप्रधान मोदी दाखवणार घरचा रस्ता

## कारवाईच्या दिल्या सूचना



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मोदी सरकार तिसऱ्यांदा सत्तेत येऊन काही महिने झाले आहेत. या काळात सरकारमधील भ्रष्ट अधिकाऱ्यांविरोधात पीएम मोदी मोठी कारवाई करणार आहेत. भ्रष्ट आणि आळशी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त करण्याच्या तयारीत सरकार आहे.

मंत्रालयांच्या कामकाजात पारदर्शकता यावी यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंत्री आणि सचिवांना मिशन मोडमध्ये काम करण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या सूचना देण्यात आली, या वेळी पंतप्रधान मोदींनी भ्रष्टाचाराविरोधातील मोहीम तीव्र करण्यावर भर दिला.

केंद्रीय नागरी सेवा नियमांचा हवाला देत, पंतप्रधान मोदी यांनी केंद्रीय सचिवांना कर्मचाऱ्यांचे मूल्यांकन करण्याचे आणि त्यांच्याविरोधात तक्रार करणाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रामाणिक आणि काम करणाऱ्या सरकारला लोकांकडून निवडणुकीत बक्षीस मिळते, यावरही त्यांनी भर दिला आहे. हरयाणा आणि जम्मू-काश्मीरमधील निवडणुकीतील भाजपच्या यशाचा दाखला देत त्यांनी सार्वजनिक तक्रारींचे त्वरित निराकरण आणि उत्तम प्रशासन यावर भर दिला.

मिळालेल्या माहितीनुसार, मोदींनी अधिकारी आणि मंत्र्यांना फायली एका डेस्कवरून दुसऱ्या डेस्कवर ढकलल्या जाणार नाहीत, पण त्या लवकर सोडवल्या जातील याची काळजी घेण्याचे निर्देश दिले आहेत. तक्रारींचे निराकरण करण्यासाठी आणि राज्यमंत्र्यांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी पंतप्रधानांनी अधिकाऱ्यांना आठवड्यातून एक दिवस देण्यास सांगितले आहे. मंत्रालयात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी लोकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी काम करावे, असेही ते म्हणाले.

भ्रष्ट किंवा आळशी असणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सेवेतून काढून टाकावे, असे मोदींनी म्हटले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मोदींनी सांगितले की, गेल्या १० वर्षांत पीएमओला लोकांच्या तक्रारींसह ४.५ कोटी पत्रे मिळाली होती, तर मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात अंतिम पाच वर्षात फक्त पाच लाख पत्रे आली होती.

पीएम मोदी म्हणाले की, यापैकी ४० टक्के प्रकरणे केंद्र सरकारच्या विभाग आणि एजन्सीशी संबंधित आहेत, तर उर्वरित ६० टक्के प्रकरणे राज्य सरकारशी संबंधित आहेत.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विविध प्रकल्पांचे लोकार्पण, उद्घाटन



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्रात झालेल्या समारंभात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विविध प्रकल्पांचे लोकार्पण आणि उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाला सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट, खासदार श्रीरंग बारणे, नरेश म्हस्के, आमदार गणेश नाईक, मंदा म्हात्रे, निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, सिडको उपाध्यक्ष विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, गणेश देशमुख, दिलीप ढोले, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, केंद्रीय वस्त्र मंत्रालयाच्या वस्त्र समितीच्या आयुक्त तथा उपाध्यक्ष रुप राशी यांसह सिडकोतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी सिडकोच्या २६ हजार ५०२ सदनिकांच्या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ, महाराष्ट्र भवन, नैना नगर रचना परियोजना ८ ते १२ मधील पायाभूत सुविधा विकास कामे, ठाणे नागरी पुनरुत्थान योजना (नवीन ३ हजार ८३३ सदनिका), पश्चिम परिघीय (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) मार्ग यांचे भूमिपूजन; १८ होल्सच्या आंतरराष्ट्रीय खारघर व्हॅली गोल्फ कोर्स व सेंटर ऑफ एक्सलन्स येथील दर्शक गॅलरी यांचे उद्घाटन आणि इर्शाळवाडी पुनर्वसन प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले.

इर्शाळवाडी दरडग्रस्तांपैकी सिडकोमध्ये कंत्राटी स्वरूपावर नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तींना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात नियुक्तीपत्रे या वेळी देण्यात आली तसेच सिडकोच्या विविध प्रकल्पांची माहिती देणाऱ्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या ठिकाणी करण्यात आले.

# पंचपरिवर्तनासाठी संपूर्ण समाजाचा सक्रिय सहभाग हवा -डॉ. भागवत

**नागपूर : प्रतिनिधी**

सामाजिक समरसता, पर्यावरण, नागरी कर्तव्य, कुटुंब प्रबोधन आणि स्वआधारित व्यवस्था हे विषय संघशताब्दी वर्षाच्या निमित्ताने स्वयंसेवक समाजापुढे नेणार असून या पंचपरिवर्तनासाठी संपूर्ण समाजाने सक्रियतेने सहभाग घ्यावा, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले. नागपुरातील रेशीमबाग मैदानावर आयोजित विजयादशमी उत्सवात ते उपस्थितांना संबोधित करीत होते.



विविध यंत्रणा आणि संस्थांकडून पसरवलेला विकृत प्रचार आणि वाईट मूल्ये भारतातील नवीन पिढीच्या विचारांवर, शब्दांवर आणि कृतींवर वाईट परिणाम करीत आहेत. मोठ्यांसोबतच लहान मुलांच्या हातातही मोबाईल पोहोचला आहे, तिथे काय दाखवले जाते, मुले काय पाहत आहेत, यावर फारसे नियंत्रण नाही. त्या सामग्रीचा उल्लेख करणे म्हणजे सभ्यतेचे उल्लंघन होईल, असे हे अत्यंत घृणास्पद आहे. आपल्या स्वतःच्या घरात, कुटुंबात आणि समाजात जाहिराती आणि विकृत दृक-श्राव्य सामग्रीवर कायदेशीर नियंत्रणाची नितांत गरज आहे, असे प्रतिपादनही सरसंघचालकांनी केले.

या वेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. कोपिल्लिल राधाकृष्णनजी यांच्यासह विदर्भ प्रांताचे संघचालक दीपक तामशेट्टीवार, सह संघचालक श्रीधरराव गाडगे आणि नागपूर महानगर संघचालक राजेशजी लोया उपस्थित होते.

# महाड औद्योगिक क्षेत्रातील जिते नाला पुन्हा प्रदूषित

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक क्षेत्रातील जिते गावाजवळ असलेल्या नाल्यामध्ये पुन्हा एकदा दुषित पाणी शिरल्याने हा नाला प्रदूषित झाला आहे. यामुळे नाल्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी फेसाळले होते. येथील ग्रामपंचायतीने एमआयडीसीला आणि प्रदूषण मंडळाला पत्र दिले आहे. यावर कोणतीच कार्यवाही झालेली नाही. या डिसाळ कारभारामुळे जिते गावाजवळील नाल्याचे प्रदूषण आजदेखील कायम आहे.



महाड औद्योगिक क्षेत्रात असलेल्या रासायनिक कंपन्यांच्या सांडपाण्यामुळे स्थानिक पाण्याचे स्रोत अडचणीत आले आहेत. गेली अनेक वर्षे सुरू असलेला प्रदूषणाचा हा प्रश्न कायम असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. महाड एम.आय.डी.सी मधील प्रदूषण हा चिंतेचा विषय बनला आहे. येथील महाड उत्पादक संघटनेकडून राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांवर या प्रदूषणामुळे प्रश्न उपस्थित करत आहे. जिते गावाजवळ असलेल्या नाल्यामध्ये पडलेल्या परतीच्या मुसळधार पावसाची संधी उठवत शेजारील कंपन्यांनी रासायनिक सांडपाणी सोडले असावे असा अंदाज स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. शेजारील कंपन्यांचे सांडपाणी या नाल्याला येऊन मिळत असल्याने हा नाला दुषित झाला आहे.

याबाबत ग्रामस्थांनी कारवाई केली जावी, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. मे महिन्यात देखील अशाच प्रकारे नाला दुषित होवून मासे मृत होण्याची घटना घडली होती. या वेळी ग्रामपंचायतीने महाड एमआयडीला पत्र देवून कारवाई करावी, अशी मागणी केली होती, मात्र महाड औद्योगिक विकास महामंडळाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे येथील नागरिक बशीर काझी यांनी सांगितले.

नुकत्याच झालेल्या प्रदूषणाबाबत जिते गावातील नागरिकांनी महाड औद्योगिक प्रदूषण मंडळाला कळवले असता त्यांनीदेखील याठिकाणी भेट देवून पाण्याचे नमुने गोळा केल्यानंतर देखील परिस्थिती जैसे थेच आहे. या नाल्याच्या जवळपास सोनल, टायटन, फ्लूबॉर, अमृत केमिकल, जॉयसन अमोनिया, एम्बायो, अशा कंपन्या आहेत. शनिवारी सकाळी जिथे नाल्याच्या जवळ असलेल्या पुलाच्या बाजूला मोठ्या प्रमाणात फेस जमा झाला होता याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासनाला कळवले असले तरी दसरा असल्याने सर्वच अधिकारी सुट्टीवर गेले आहेत. पडणारा पाऊस आणि सलग सुट्ट्या याचा फायदा या कंपन्यांनी उठवून नाल्यामध्ये रासायनिक सांडपाणी सोडले असावे, असा अंदाज ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

महाड औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषणाचा मुद्दा गेली अनेक वर्ष कायम असून प्रदूषण मंडळाच्या वतीने याबाबत ठोस कारवाई केली जात नसल्याने लहान मोठ्या कंपन्या प्रदूषण करण्यात आजही मागेपुढे पाहत नाहीत. औद्योगिक क्षेत्रातील कंपन्याचे संघटन दर वर्षी प्रदूषण दूर केल्याचा आव आणतात, मात्र प्रदूषण कायम असल्याचे आजच्या घटनेने पुन्हा एकदा समोर आले आहे.

**जिते गावाजवळ असलेल्या नाल्यामधून स्थानिक ग्रामस्थांच्या जनावरांना पिण्याच्या पाण्याची सुविधा होते. शिवाय शेजारील कडधान्यालादेखील हे पाणी वापरले जात होते, मात्र गेली कांही वर्षापासून हा नाला दुषित होत असल्याने मोठी समस्या निर्माण झाली आहे.**

**-बशीर काझी, स्थानिक ग्रामस्थ, जिते**

# 'लिटिल सिड्स'मध्ये दसरा उत्साहात

**उरण : वार्ताहर**



उरण एज्युकेशन सोसायटीच्या लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री-स्कूलमध्ये शनिवारी (दि. १२) दसरा उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना, पाटीवर काढलेल्या सरस्वतीच्या चित्रावर फुले व हळदीकुंकु वाहून पाटीपूजा करण्यासाठी सांगितलं जातं.

युईएस सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता ह्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यांच्यासोबत स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक, पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, समन्वयक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पूर्व प्राथमिक विभागातील एका शिक्षिकेने दसरा का साजरा केला जातो ह्याची माहिती सांगितली. त्यानंतर संगीत शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली एक सुंदरशी सरस्वती वंदना माध्यमिक विभागाच्या विद्यार्थांनी सादर केली.

ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या यांनी आपल्या मनोगतातून सर्वांना दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. ह्या संपूर्ण कार्यक्रमातील उपस्थितांचे स्वागत, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन पूर्व प्राथमिक विभागातील शिक्षिकांनी केलं. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतर्फे विद्यार्थी व पालकांना मिठाईचे आणि आपट्याच्या पानाच्या प्रतिकृतीचे वाटप करण्यात आले, अशा रितीने उरण एज्युकेशन सोसायटीस लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री-स्कूलमध्ये दसरा उत्साहात साजरा करण्यात आला.

# पनवेल ते नांदेडदरम्यान उत्सव विशेष ट्रेन चालवणार

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वे दसरा,दिवाळी/छट पूजा सणांमध्ये प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन पनवेल आणि नांदेड दरम्यान २४ अतिरिक्त उत्सव विशेष गाड्या चालवणार आहे. याचा फायदा प्रवाशांना होणार आहे.

विशेष गार्डनमध्ये ०७६२६ /०७६२५ पनवेल-नांदेड-पनवेल द्वि-साप्ताहिक विशेष-(२४ सेवा) गाडी क्रमांक ०७६२६ द्वि-साप्ताहिक उत्सव विशेष पनवेल येथून २२.१०.२०२४ ते दि. २८.११.२०२४ पर्यंत दर मंगळवार आणि गुरुवारी १४.३० वाजता सुटेल आणि हजूर साहिब नांदेड येथे दुसऱ्या दिवशी ०४.३० वाजता ह पोहचेल. (१२ सेवा), गाडी क्रमांक ०७६२५ द्वि-साप्ताहिक उत्सव विशेष हजूर साहिब नांदेड येथून दि. २१.१०.२०२४ ते दि. २७.११.२०२४ पर्यंत दर सोमवार आणि बुधवारी २३.०० वाजता सुटेल आणि पनवेल येथे दुसऱ्या दिवशी १३.२५ वाजता पोहचेल. (१२ सेवा) या गाडीसाठी कल्याण, इगतपुरी, नाशिकरोड, मनमाड, नागरसोल, रोटेगाव, लासूर, औरंगाबाद, जालना, परतूर, सेलू, मानवत, परभणी आणि पूर्णा हे थांबे देण्यात आले आहेत. ट्रेन क्रमांक ०७६२६ च्या आरक्षण सेवांसाठी विशेष शुल्कासह बुकिंग १४.१०.२०२४ रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू होईल.

तपशीलवार वेळा आणि थांब्यासाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करा, असे आवाहन मध्य रेल्वेकडुन करण्यात आले आहे.

# गव्हाण विद्यालयात शालेय साहित्यवाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील उपशिक्षिका द्रौपदी वर्तक यांनी त्यांचे सुपुत्र चिरंजीव जय रमेश वर्तक याच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना परीक्षेच्या पार्श्वभूमीवर लेखन पॅड म्हणजेच रायटिंग पॅडचे वितरण केले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, ज्येष्ठ शिक्षिका यु.ए.म्हात्रे, योगिता पाटील,सांस्कृतिक विभागप्रमुख एच.आर.पाटील, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, शितलकुमार म्हात्रे, प्रशांत परदेशी, उर्मिला गोंधळी, सुजाता शेलार, प्रणाली पाटील आणि अन्य मान्यवरांचे हस्ते या लेखन साहित्याचे वितरण विद्यार्थ्यांना करण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांनी द्रोपती वर्तक ह्यांचे या दानशील उपक्रमाबद्दल अभिनंदन करून अशा प्रकारचा उपक्रम गरीब, होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून ऐन परीक्षेच्या तोंडावर विद्यार्थ्यांना रायटिंग पॅड (लेखन पॅड) उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले तसेच अशा दातृत्वाचा वारसा समृद्ध व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या वेळी उपशिक्षिका द्रोपती वर्तक यांच्यासह त्यांचे सुपुत्र चिरंजीव जय रमेश वर्तक व सुकन्या दीक्षा रमेश वर्तक याही उपस्थित होत्या.

पान १ वरुन

## पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता करावरील शास्ती माफ

या वेळी महापालिका हद्दीतील प्रभाग समिती अ, प्रभाग क्र. १ कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पूल बांधणे, केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान २.० पाणीपुरवठा योजनेंतर्गत सिद्धी करवले आणि आडीवली येथे तलाव पुनरूज्जीवन व सुशोभीकरण करणे, मुर्बी येथे १.७५ लक्ष लिटर्स क्षमतेचा उंच जलकुंभ बांधणे व डीआय पाईपची वितरण व्यवस्था करणे, खारघर से. १६ प्लॉट नं १३ येथे खेळाचे मैदान विकसित करणे, से. १५ प्लॉट नं. २५, २५बी येथे विरंगुळा केंद्र बांधकाम करणे, प्लॉट नं. २५, २५बी येथे उद्यान विकसित करणे, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण सन २०२२-२३ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हा स्तर) महापालिका क्षेत्रातील विविध तलाव व गार्डन परिसर विद्युत व्यवस्थेसह विकसित करणे, खारघर सेक्टर ५ प्लॉट नं. १० व १९ येथे उद्यान विकसित करणे, महापालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या विशेष तरतूद वितरीत निधी अंतर्गत एकूण ६४ ठिकाणी सोलार हायमास्ट बसविणे, अमृत अभियान २.० पाणीपुरवठा योजनेंतर्गत बेलपाडा येथे ४.८० लक्ष लिटर्स क्षमतेचा उंच जलकुंभ बांधणे व डीआय पाईपची वितरण व्यवस्था करणे, महापालिका क्षेत्रातील दुभाजकांचे सौंदर्यीकरण करणे, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हा स्तर) २०२४-२५ योजनेंतर्गत विविध उद्यानांचा विकास करणेसाठी नवनवीन साधने उपलब्ध करून देणे, उद्यानांमध्ये मुलांच्या विरंगुळ्यासाठी आधुनिक व आकर्षक साधने उपलब्ध करून देणे, उद्यानांमध्ये कलाकृती निर्मिती करणे या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. याआधी ८ ऑक्टोबर रोजी ३०२ कोटी रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ झाला होता.

दरम्यान, खारघरमधील शिल्प चौकाजवळील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके उद्यानात प्लास्टिक बाटली इको ब्रीक पेटीचे उद्घाटन या वेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. रिसायकलिंगचे चिन्ह असणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्यांचा इको ब्रीकमध्ये वापर करता येतो. अशा वापरलेल्या बाटल्यांचे संकलन करण्यासाठी हे केंद्र सुरू करण्यात आले आहे.

## पनवेल मतदारसंघात विकासाचा वारू वेगात

धनाजी म्हात्रे, निवास म्हात्रे, अशोक माळी, बुधाजी पारधी, दत्ता म्हात्रे, रवी म्हात्रे, सदानंद म्हात्रे, भरत भोपी, बाळाराम भोपी, कृष्णनाथ भोपी, विष्णू म्हात्रे, माजी सरपंच शांताराम पोपेटा, गाव कमिटी अध्यक्ष नारायण माळी, माजी सरपंच माधुरी नितीन पोपेटा, अलका प्रकाश तांडेल, माजी उपसरपंच रोशन पोपेटा, गाव कमिटी उपाध्यक्ष मदन मढवी, रघुनाथ मोहिते, हिरा पोपेटा, जगन पोपेटा, सुनील मढवी, भरत तांडेल, अनंता मोहिते, रमेश, दिनेश पोपेटा, गुरूनाथ भोपी, गुलाब चौधरी, शांताराम चौधरी, नारायण चौधरी, विष्णू चौधरी, काशिनाथ चौधरी, तुकाराम चौधरी, भगवान चौधरी, सुनील चौधरी, हनुमान चौधरी, भरत चौधरी, संजय जळे, गुलाब सिनारे, राम खारूटकर, विलास खारूटकर, चंद्रकांत चौधरी, पांडुरंग शेळके, संजय चौधरी, राजाराम चौधरी, अनंता चौधरी, रवींद्र चौधरी, भाऊ चौधरी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# पनवेलमधील विजेचा प्रश्न निकाली

## ◆ शहरात दोन ट्रान्सफॉर्मरची उभारणी
## ◆ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात नव्याने दोन ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आल्याने या परिसरातील वारंवार जाणाऱ्या विजेचा प्रश्न निकाली लागला आहे. या कामासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढाकार घेतला असून माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते शनिवारी (दि.१२) दसऱ्याच्या शुभमुहुर्तावर या ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन झाले.



पनवेल शहरातील लाईन आळी तसेच आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना तसेच प्रामुख्याने व्यापारी वर्गाला वारंवार विज जाण्याची समस्या भेडसावत होती. या समस्येबाबत त्यांनी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांना माहिती दिली. त्यानुसार दर्शना भोईर यांनी पाठपुरावा सुरू करून ही समस्या मार्गी लावण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांना माहिती दिली. आमदारांनी त्वरीत विजेची समस्या मार्गी लावण्यासाठी नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्यासाठी जिल्हा नियोजन निधीमधून ४० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला.

ट्रान्सफॉर्मर बसवण्याचे काम पूर्ण झाले असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत आणि माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, महावितरण विभागाचे अभियंता मंदार सावंत, श्रीलेशा दबडे, श्वेता वाणी, यश संजय जाधव, भावीन शहा, यश चौगुले, बालाराम पाटील, अतुल जोशी, हर्ष परिहार, मोहम्मद अली उपस्थित होते.

# झंकार दांडियाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

झंकार नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानात साजरा झाला. नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून शेवटच्या दिवसापर्यंत दांडीयाला रसिकांचा चांगला प्रतिसाद लाभला.

प्रत्येक दिवशी उत्कृष्ट दांडीया रास करणाऱ्यांना आकर्षक, अशी बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास हौसिंग सोसायटी मित्र मंडळ यांच्या वतीने झंकार नवरात्रोत्सव २०२४ चा बक्षीस वितरण समारंभ शुक्रवारी झाला. यामध्ये सिद्धी आंग्रेने प्रथक क्रमांचे पारितोषक पटकावले असून तिला माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते स्कूटी देऊन गौरवण्यात आले.

या उत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक राजू सोनी, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, संजय जैन, चिटणीस अमरीश मोकल, उद्योजक मंगेश परूळेकर, शहर उपाध्यक्ष अमित ओझे, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष सुमीत झुंझारराव यांच्यासह पदाधिकारी, रहिवासी आणि दांडीया रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## निवडक

### आश्रमशाळेला साहित्य वाटप



**उरण :** श्री स्वामी समर्थ बेरोजगार सामाजिक संस्था जासईच्या महिला रणरागिणीनी सामाजिक जीवनाशी बांधिलकी जपत नवरात्रौत्सवाचे औचित्य साधून अनुदानित प्राथमिक आश्रमशाळा चिरनेर येथे एक स्मार्ट टिव्ही संच, एक कपाट भेट देऊन आदिवासी विद्यार्थ्यांसाठी साबण, कोलगेट आणि खाऊचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या अध्यक्षा जयश्री ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेच्या उपाध्यक्षा प्रिती म्हात्रे, सचिव सरिता म्हात्रे, खजिनदार स्वाती पाटील, शोभा म्हात्रे, निलम म्हात्रे, सरिता म्हात्रे, जयश्री पाटील, जनाबाई घरत, राजश्री म्हात्रे, ज्योती घरत, स्मिता सतिश म्हात्रे, पौर्णिमा कांबळे, कामिनी पाटील, लक्ष्मी म्हात्रे यांच्यासह आश्रम शाळेचे मुख्याध्यापक आप्पासाहेब मोरे, उपमुख्याध्यापक रामचंद्र मोरे, महादेव डोईफोडे, शिक्षिका साधना शिंदे, शिवाजी साळुंखे आदी उपस्थित होते.

### अक्षीकर संकुलात सरस्वती पूजन



**उरण :** शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या कै. गो.ना. अक्षीकर विद्या संकुलातील जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट इंग्लिश मीडियम स्कूल उरण प्री प्रायमरी आणि प्रायमरी यांच्यातर्फे शाळेमध्ये सरस्वती पूजा साजरी करण्यात आले. या वेळी शाळेचे स्कूल कमिटीचे चेअरमन सदानंद गायकवाड, माजी उपसभापती वैशाली पाटील, सामाजिक कार्यकर्ते निलेश पाटील, संकुलातील सर्व मुख्याध्यापक उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांच्या उपस्थितीत सरस्वती पूजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

### माताजी ग्रुपतर्फे भजन सादर

**पनवेल :** पनवेलमध्ये गेल्या १० वर्षांपासून विविध ठिकाणी भजनाचे कार्यक्रम सादर करून तेथे मिळणारे उत्पन्न किंवा मानधन हे गो शाळेला वाटप करणाऱ्या माताजी ग्रुप पनवेल महिला मंडळाचा यंदाचे १० वे वर्ष असून त्यांनी या वेळी सुद्ध नवरात्री हिंदु सार्वजनिक महोत्सव मंडळ पनवेल व दुर्गा माता मंदिर पनवेल येथे भजन सादर केले आहे. महिला मंडळ हे श्रावणातसुद्धा विविध ठिकाणी भजने व धार्मिक कार्यक्रम सादर करीत असतात. त्यामध्ये प्रामुख्याने मंजुला कलोर, मधु परमार, जशोदा कुमावत, नीमा वैष्णव, नीलम वैष्णव, मंजुला चुडावत, मंजु सुखवाल, सिता कुमावत या सादर करीत असतात. व यांना मिळणारे उत्पन्न सामाजिक कार्यासह गरजवंत आणि गो शाळेला देत असल्याने त्यांचे पनवेलमध्ये कौतुक होत आहे.



# त्रिकुटासह अमली पदार्थ जप्त

## एकटपाडा येथे धाड

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस दलाच्या अमली पदार्थविरोधी कक्षाच्या पथकाने तळोजा परिसरातील एकटपाडा येथील एका इमारतीमध्ये धाड घालून मंगळवारी (दि.८)२५ लाखांचा अमली पदार्थांच्या साठ्यासह तिघांना अटक केली. मागील अनेक महिन्यांतील ही सर्वांत मोठी कारवाई आहे.

अमली पदार्थांचा काळाबाजार नवी मुंबईत फोफावला आहे. यापूर्वी पोलिसांच्या पथकाने विविध कारवाईत लाखो रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केले आहेत, तरीही अमली पदार्थांचा काळाबाजार सुरूच आहे. नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी उपायुक्त अमोल काळे व सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांना अमली पदार्थांविरोधात सक्तीच्या कारवाईच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक संदीप निगडे, सहाय्यक पोलीस निरिक्षक निलेश धुमाळ, श्रीकांत नायडु यांच्या पथकाला तळोजातील एका इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांचा साठा असल्याची माहिती मिळाली होती. तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अविनाश काळदाते यांच्या पथकासोबत संयुक्त कारवाई करण्यासाठी एकटपाडा परिसरातील आयजी. रेसीडेन्सी या इमारतीमध्ये सदनिका क्रमांक २०६मध्ये मंगळवारी दुपारी पोलिसांनी धाड घातली.

या वेळी एक नायजेरीयन व्यक्तीसह दोन पनवेलच्या दोन व्यक्तींना अमली पदार्थांसह पोलिसांनी ताब्यात घेतले. या धाडसत्रात पोलीसांना सव्वालाख रुपयांची मेफेड्रॉन पावडरसह, २१ लाखांचे कोकेन असे १२७ ग्रॅम अमली पदार्थ सापडले. या टोळीच्या मुख्य सूत्रधाराचा शोध पोलीस घेत आहेत.

# नवीन पनवेलमध्ये आरोग्य शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब पनवेल सरगम आणि दादासाहेब लिमये सार्वजनिक वाचनालय, नवीन पनवेल यांचेतर्फे अपोलो हॉस्पिटलचे सौजन्याने वाचनालयामध्ये महा आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

या शिबिरामध्ये इसीजी, मधुमेह, रक्तदाब, बी एम आय आदि तपासण्या मोफत करण्यात आल्या. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ६९ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

या शिबिराचे उद्घाटन रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोंदार्डे यांचे हस्ते झाले. या वेळी कोकण विभाग ग्रंथालय संघाचे संजय खांबेटे, लिमये वाचनालयाचे अध्यक्ष हेमंत पाटील, सचिव संजय गोडसे, संस्थापक के.एस. पाटील, सरगम क्लबच्या अध्यक्ष मानदा पंडित, सचिव प्रेमेंद्र बहिरा, झोन चेअरमन अलकेश शहा, जयेश मणियार,



एचओसी ओबीसी संघटनेचे तसेच प्रियदर्शिनी पतपेढीचे पदाधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाला लायन्सचे प्रांतपाल एन आर परमेश्वरन, जी एस टी चेअरमन विजय गणात्रा, उमंग देसाई यांनीसुद्धा भेट देऊन आयोजकांचे अभिनंदन केले. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथपाल अनिल पाटील, थळी, विनोद वर्तक, अरविंद पाटील आदींनी खूप परिश्रम घेतले.

# कोळखे आणि पारंपुड गावातील रस्त्याच्या विकासकामांचा शुभारंभ

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण मतदार संघातील कोळखे आणि पारंपुड गावातील रस्त्याच्या विकास कामांचा शुभारंभ भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी (दि.१२)झाले.

उरणचे दमदार आमदार महेश बालदी यांच्या ३५ लाख जिल्हा वार्षिक नियोजन निधीमधून राष्ट्रीय महामार्ग १७ ते पळस्पे डेरवली ते राष्ट्रीय महामार्ग ४ ला मिळणारा रस्ता तयार करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले तसेच या वेळी आमदार महेश बालदी यांच्या १० लाख रुपयांच्या निधीमधून पारपुंड येथे अंतर्गत रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले होते. हे काम पुर्ण झाले असून याचे लोकार्पणही अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी झाले.



या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भुपेंद्र पाटील, दशरथ म्हात्रे, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, शिवकर ग्रामपंचायतीचे आनंद ढवळे, अप्पा भागीत, योगेश लहाणे, विनेश भागीत, माजी सरपंच अशोक मुंडे, उपसरपंच अपेक्षा जाधव, मिलींद सुरते, सुनील गवंडी, विलास भोईर, रमेश सुरते, ग्रामपंचायत सदस्या लीना पाटील, अपेक्षा जाधव, नासिर शेख, विलिंद सुरते, रमेश सुरते, विलास भोईर, सोमेश जाधव, नंदकुमार जाधव, महेंद्र पाटील, राजेंद्र जीतेकर, अक्षय मुंढे, रेहान पाटील, श्रद्धा जाधव, गौरी पाटील, अरबाज शेख, शकील शेख, जावेद शेख, कमसीन डावरे, अबसार शेख, मुसलीम शेख, धनंजय पदधे, इम्रान बोबडे, सकिना शेख, शकील शेख, नाजीद भट्टी, फरखद्दीन शेख यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयात दांडिया उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू कांना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवारी (दि.११) सांस्कृतिक समितीच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त दांडिया रासचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास माजी नगरसेविका सुशीला घरत, जगदीश घरत, पालक प्रतिनिधी रजनी फडके, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील तसेच विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते.

सायन्स विभागातर्फे कपिल दांडगे व विजया गजाकोश तर कला व वाणिज्य विभागातर्फे ज्योती वाघ व मिलिंद सुरवाडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. दांडिया रास मध्ये सायन्स विभागातून मुलींमधून श्रेया सुरेश कळेकर (बारावी विज्ञान), दुर्वी जयंती पटेल (अकरावी वाणिज्य) या विद्यार्थिनीची 'दांडिया क्वीन' तर मुलांमधून सार्थ प्रकाश सावंत (बारावी विज्ञान), शिवम दिपू दुबे (अकरावी वाणिज्य) या विद्यार्थ्यांची 'दांडिया किंग' म्हणून निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्हे देऊन गौरव करण्यात आला.






**पनवेल : महापालिका हद्दीमध्ये विकासकामांचा धडाका सुरू आहे. या अंतर्गत प्रभाग समिती क मधील प्लॉट ७ए सेक्टर १६ या ठिकाणी प्रभाग कार्यालयाची उभारणी महापालिकेच्या माध्यमातून चार कोटी ४५ लाख ८३ हजार ६१० रुपये खर्चून करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. या वेळी माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शुभम कांबळे आदी उपस्थित होते.**

# स्वामी समर्थ आदिमाया रूपात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील गावदेवी पाड्यावर असणाऱ्या स्वामी मठात (मंदिरात) वर्षभर विविध धार्मिक उपक्रमांची रेलचेल असते. विशेष करून महाराज्यांच्या तसबिरीला नवरात्रीत नऊ दिवस निरनिराळ्या नऊ रंगाच्या वस्त्रामध्ये आदिमाया स्वरूप दिले जाते.



विविध अलंकाराने सजवले जाते. आदिमाया स्वरूप येव्हढे तेजोमय असते की कित्येक स्वामी समर्थ भक्तांना मोबाईलमध्ये फोटो काढण्याचा मोह आवरता येत नाही. श्री स्वामी समर्थांची लीला अगाध आहे. महाराजांनी त्यांच्या भक्ताला विविध देवांच्या रूपात दर्शन दिले आहे. नवरात्रीत नऊ दिवस महाराजांना आदिमाया स्वरूप देऊन नऊ दिवसात प्रत्येक दिवशी निरनिराळ्या रंगाच्या वस्त्रांनी सजवले जाते. तसेच नऊ दिवस मठात (मंदिरात) रोज पोथी वाचनाबरोबर नवमीला मोठा होम हवन केला जातो, असे मठाधीपती सुधाकर घरत यांनी सांगितले.

# माधुरी दीक्षित सौ. श्रीराम नेने झाली, त्याचा २५वा वाढदिवस

माधुरी दीक्षितला आम्ही सिनेपत्रकारांनी सर्वाधिक वेळा विचारलेला प्रश्न कोणता?

एन. चंद्रा दिग्दर्शित तेजाब (१९८८)मधील एक दो तीन चार या तजेलदार तडफदार उत्फूर्त गीत संगीत नृत्यात तुला आव्हानात्मक काय वाटले हा प्रश्न की सूरजकुमार बडजात्या दिग्दर्शित हम आपके है कौन (१९९४)च्या सेटवरील कौटुंबिक खेळकर खोडकर वातावरणातील आठवणीतील क्षण कोणता? हे प्रश्न केले असतील की सुभाष घई दिग्दर्शित खलनायक (१९९३) चोली के पीछे क्या है या मसालेदार मनोरंजक गाण्याच्या उलटसुलट चर्चेच्या वादळात स्वत:ला गप्प ठेवण्यात यश कसे मिळवले हा प्रश्न असेल? यापैकी काहीच नाही.



यश चोप्रा दिग्दर्शित 'दिल तो पागल है' १९९७च्या दिवाळीत प्रदर्शित होत असतानाच आम्ही सिनेपत्रकार माधुरी दीक्षितच्या मुलाखतीचा योग आला असता, तू लग्न कधी करणार? असा प्रश्न करीत होतो. इंग्लिश गॉसिप्स मॅगझिन असो, हिंदी फिल्मी साप्ताहिके असो अथवा मराठी दैनिकातील मनोरंजन पुरवणी असो, माधुरीला लग्नाबद्दल प्रश्न ठरलेलाच. लग्न ही सगळ्यांचीच खासगी गोष्ट, पण नटीचे लग्न ही गोष्ट कोणत्याही काळात रंजकच राहिलीय. जणू महत्त्वाची बातमीच. माधुरीदेखील या प्रश्नावर उत्तर देताना, नेहमीप्रमाणेच हसत हसत म्हणायची, वेळ आली की समजेलच वा सांगेनच. माधुरीचं मी एक वैशिष्ट्य कायमच पाहिलयं अडचणीचे प्रश्न असोत, वादग्रस्त मुद्दा असो, ती उत्तर टाळणारच. आपल्या बोलण्यातून आणखी काही वाद विवाद जन्माला येऊ नयेत याकडे तिचा कल. काही झालं तरी





ती संस्कारी आणि जबाबदारीची जाणीव असलेली सुपरस्टार.

ते काही असो, माधुरी दीक्षित लग्न कधी करणार याची तिचे जगभरातील चाहते, चित्रपटसृष्टी आणि चित्रपट प्रसारमाध्यमे अशी सगळीकडेच उत्सुकता होती. अशातच १९९९च्या पहिल्या तिमाहीत तिने आपल्या पहिल्या हिरेन नाग दिग्दर्शित अबोध (१९८४) या चित्रपटापासूनच्या दिग्दर्शकांना जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये शानदार पार्टी दिली तेव्हा अनेकांना वाटले, माधुरी लवकरच लग्न करणार असे दिसते. (आणि लग्न झाल्यावर चित्रपटसृष्टीला रामराम करणार की काय? नटीच्या लग्नातील जोड प्रश्न) मग तो भाग्यवान कोण बरे? तिचा होणारा पती चित्रपटसृष्टीतील असणार की अन्य क्षेत्रातील? मुंबईतील की भारताबाहेरील असे अनेक प्रश्न एकावर एक पडायला लागले. त्यात भर पडली तिने काही महिन्यातच आपल्या वाढदिवसानिमित्त (१५ मे) मुंबईतील आम्हा निवडक सिनेपत्रकारांना जुहूच्या त्याच पंचतारांकित हॉटेलमध्ये चायनीज जेवणाची शानदार पार्टी दिली. सर्व खुर्च्यांना पांढऱ्या शुभ्र कपड्यांनी छान सजवले होते हे आजही डोळ्यासमोर आहे. आम्हा प्रत्येक सिनेपत्रकाराचे तिने छान हसून स्वागत केले. तिच्या ज्या हास्यावर करोडो रसिक फिदा आहेत तेच दिलखुलास निखळ हास्य आपलं स्वागत करतेय, नशीबात आणखी काय हवे? अर्थात मी मीडियात असल्यानेच असे अनेक सुवर्ण क्षण अनुभवले. या पार्टीत माधुरी चक्क गायली. हा अनुभव तर एक्स्युझिव्हज आणि ही पार्टी तिच्या वाढदिवसानिमित्त असली तरी तिच्या लग्नाचा प्रश्न आलाच. तीदेखील हसून उत्तर देत होती तरी लक्षात येत होते की, त्या दिशेने ती चाललीय. उत्तर हवे होते, पण



कोणाशी लग्न?

काही दिवसांनी माधुरी अमेरिकेत भावाकडे गेल्याचे समजले. सगळेच आपापल्या कामात बिझी झाले. चित्रपटसृष्टी कोणासाठी थांबणारी नाही. त्यामुळेच अनेक गोष्टी मागे पडत जातात आणि अशातच ५ नोव्हेंबर १९९९ रोजी आज तक या उपग्रह वृत्तवाहिनीवर बातमी आली,

माधुरी दीक्षित ने १७ ऑक्टोबर १९९९ को अमेरिका मे डॉ. श्रीराम नेने के साथ शादी रचाई... ही बातमी इतकी आणि अशी अनपेक्षित आणि धक्कादायक होती की नेमके काहीच लक्षात येईना. बरं ही बातमी तिचा स्टार सेक्रेटरी रिक्कू यानेच आज तक वाहिनीला दिली होती. (त्यात काळात दररोज रात्री साडेनऊ ते दहा या वेळेत आज तक उपग्रह वाहिनीवर बातम्या असत. त्या बातम्यांची विश्वासार्हता होती. या वाहिनीचा स्वत:चा हुकमी प्रेक्षकवर्ग होता)

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

आता प्रश्न होता, माधुरी दीक्षितचा नवरा दिसतो कसा? माधुरी अमेरिकेवरुन कधी येणार? तिने अमेरिकेत लॉस एन्जल्स, दक्षिण कॅलिफोर्नियातील आपल्या मोठ्या भावाच्या घरी पारंपरिक पद्धतीनुसार लग्न केल्याचे समजले. बाकीच्या तपशीलांचे काय? सोशल मीडिया यायच्या अगोदरचा हा काळ होता. मोबाईल नवीनच होता. अमेरिका लांबच वाटत होती.

आणखी काही दिवस गेले. डॉ. श्रीराम नेने कसे दिसतात याची उत्सुकता विलक्षण ताणली जात होती. काही झाले तरी ते सुपरस्टार अभिनेत्रीचे पती आणि आपल्या समाजात नवदाम्पत्याबद्दल कायमच कुतूहल.

...आणि अशातच बातमी आली. माधुरी दीक्षित आपल्या पतीसोबत मुंबईत परतली असून डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात तिच्या लग्नाचे शानदार रिसेप्शन आहे. आता डॉ. श्रीराम नेनेंबद्दलची उत्सुकता विलक्षण वाढलेली. नटीचा नवरा या नावाचा अद्याप चित्रपट निर्माण झाला नसला तरी हा प्लॉट भारी आहे.

...अखेर तो दिवस (खरंतर संध्याकाळ) उजाडला. अंधेरी पश्चिमेकडील द क्लब येथे डॉ. श्रीराम नेने व माधुरी दीक्षित यांच्या लग्नाचा शानदार स्वागत सोहळा अर्थात रिसेप्शन. आज तक वाहिनीने काही मिनिटांचे दाखवलेले लाईव्ह कव्हरेज भन्नाट ठरले. माधुरी दीक्षितचा पती तिच्या अगणित चाहत्यांना दिसण्याचा हा पहिलाच सुखद योग होता. दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्राच्या पहिल्याच पानावर या नवदाम्पत्याचा छानसा चार कॉलम फोटो. दिसला गं बाई दिसला, माधुरी दीक्षितचा नवरा दिसला, अशी छानशी प्रतिक्रियाही उमटली.



लोकल ट्रेनपासून ऑफिसमधील कॅन्टीनपर्यंत आणि इराणी हॉटेलपासून कॉलेज कट्टापर्यंत सगळीकडेच या नवदाम्पत्याबद्दल सकारात्मक चर्चा. कोणी कोणी म्हटलंही आपली माधुरी दीक्षितच सरस. खरंच आहे म्हणा.

लग्नानंतर काही चित्रपट पूर्ण होताच माधुरी अमेरिकेत गेलीदेखील. आता ती डेन्वरची रहिवासी होती. चित्रपटसृष्टी कोणासाठी थांबत नाही. पिक्चर हिट व फ्लॉपचा खेळ सुरूच असतो. नवीन दशकाची सुरुवात झाली होती. माधुरी आपली मुले अरिन (आज तो एकवीस वर्षांचा आहे) आणि रायन (आज तो एकोणीस वर्षांचा आहे) यांच्या पालनपोषणात रमली असतानाच २०११च्या ऑक्टोबरमध्ये ती आपले पती डॉ. श्रीराम नेने आणि दोन्ही मुलांसह मुंबईत आली ती पुन्हा कॅमेऱ्यासमोर उभी राहिली. दरम्यान एकदा येऊन तिने यशराज फिल्मच्या आजा नचले या चित्रपटात नृत्यप्रधान भूमिका साकारली, पण त्यात रंजकता नव्हती, परंतु पुन्हा आल्यावर ती आपला फिटनेस, आपलं नृत्य, आपलं ग्लॅमर, आपली लोकप्रियता, आपली व्यावसायिकता, आपले व्यावसायिक संबंध या सगळ्यांची बेरीज करून तिने पुन्हा मनोरंजन क्षेत्रातील आपली जागा पटकावली. आपल्या अष्टपैलू, मेहनती कारकिर्दीतील चाळीसाव्या वर्षीदेखील ती आजचीच तारका आहे, तर मग आणखी काय हवे? डॉ. श्रीराम नेने सोशल मीडियात कार्यरत आहेत. आपण इराणी हॉटेलमधून खारी बिस्किटे घेतली अशा काही पोस्ट त्या टाकत असतात. वरळीतील एका अतिशय प्रशस्त घरात आता हे कुटुंब आनंदात राहतेय. माधुरी दीक्षित यू ट्यूब चॅनेलवरून जगभरातील अनेकांना नृत्याचे धडे शिकवतेय. सोशल मीडियाच्या युगात आपण वावरतोय याचे तिने पक्के भान ठेवलेय.

लग्नानंतर पंचवीस वर्षांत माधुरी दीक्षितने संसार, संस्कार, अभिनेत्रीपण आणि लोकप्रियता या गुणांची बेरीज छान जपलीय. माधुरी दीक्षितने मराठी समाजाची सांस्कृतिक प्रतिनिधी म्हणून आपली ओळख छान जपलीय. संसारात कुरबुरी झाल्या असतीलही, पण त्या गॉसिप्स मॅगझिनमधून चवीने चघळल्या गेल्या नाहीत. अभिनेत्रीपण आणि घर यांचा समतोल छान साधलाय. तेच तर तिच्या यशाचे गमक आहे. आणि चित्रपटसृष्टीत यश हेच चलनी नाणे असते तर मग आणखी काय हवे?

# मराठी पत्रकारितेतील पहिल्या पूर्णवेळ महिला वार्ताहर नीला उपाध्ये

मराठी पत्रकारितेतील पहिली पूर्णवेळ वार्ताहर, साहित्यिक नीला वसंत उपाध्ये यांच्या निधनाने आपण एका ज्येष्ठ पत्रकार, सिद्धहस्त साहित्यिकाला मुकलो आहोत. त्यांच्या साहित्याचा अभ्यास केला तर आपल्या सहज लक्षात येईल की त्यांच्या लेखणीचे साहित्यगुणही निर्विवाद आहेत. त्यांच्या प्रवाही-संवादी भाषाशैलीने साकारणाऱ्या साऱ्या साहित्यात आत्मप्रतिष्ठा व समानतेचा आग्रह धरणाऱ्या जीवनमूल्यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. म्हणूनच पत्रकारिता म्हणजे घाईघाईत लिहिलेलं साहित्य अशी संभावना सहसा ज्याची केली जाते, ते पत्रकारितेतील नीलाताईंचे साहित्यही वाचकांच्या वैचारिक आकलनाचा परीघ व्यापक करून जाते, त्याला भावनिकदृष्ट्याही समृद्ध करून जाते इतकी ताकद त्यांच्या लेखनात होती.

नीलाताईंचे पत्रकारितेतील गुरू कै. दि.वि. गोखले यांनी त्यांना लेखनासाठी दिलेला एक गुरूमंत्र नीलाताईंनी कायम आपल्या मनात कोरून ठेवला होता, तो म्हणजे पत्रकाराने नेहमी अलक्षित विषयावर लेखन केले पाहिजे. चरित्र लेखन करताना नीलाताईंनी ते नेहमीच लक्षात ठेवले. त्यामुळेच ऑस्कर विजेते भारतीय चित्रपट दिग्दर्शक सत्यजित राय यांचे मराठीतील पहिले चरित्र त्यांच्याकडून लिहिले गेले. त्यांचा पहिला कथासंग्रह २००७ साली प्रकाशित करण्यात आला, त्याचे नाव होते ती आणि त्या हा कथासंग्रह काढता नीलाताईंच्या घरच्या सर्व पसाऱ्यातून त्यांच्या साहित्याची कात्रणे शोधून काढावी लागली. इतक्या लाखो शब्दांतून वेचक निवडक नीलाताई कशा वेचायच्या असा प्रश्न त्या वेळी आम्हाला पडला होता.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर म्हणजे मराठी पत्रकारितेचे जनक. अनेकांना ६ जानेवारीला आपण पत्रकार दिन का साजरा करतो हे ठाऊक नसल्याचे लक्षात आल्यानंतर नीलाताईंनीच प्रथम बाळशास्त्री जांभेकरांचे संदर्भपूर्ण चरित्र लिहिले. त्या चरित्राला ज्येष्ठ पत्रकार ब.ना. जोग यांनीही दाद दिली.

कवयित्री शांताबाई शेळके यांच्यावर आजपर्यंत अनेक पुस्तके लिहिली गेली, पण एका प्रेमळ वाक्यासाठी शांताबाईंना मानणाऱ्या नीलाताईंनी प्रथम शब्दव्रती शांताबाई हे चरित्र आपल्या ओघवत्या भाषेत लिहिले. ते इतके लोकप्रिय झाले की त्याची तिसरी आवृत्ती काढावी लागली. जे.के.रोलिंगलिखित हॅरी पॉटर जोरात चालू होता, तर नीलाताईंनी लगेच हॅरी पॉटरची आई हे जे.के.चे छोटेखानी, पण रसाळ चरित्र मराठी बालकुमारांसाठी लिहिले. पत्रकार दि.वि.गोखले व्यक्तीत्व व कर्तृत्व हा ग्रंथ तर पत्रकारितेशी संबंधित प्रत्येकालाच वाचनीयच नव्हे; तर मननीय असा झाला आहे. या साऱ्या चरित्र लेखनातून नीलाताईंमधला कृतज्ञ माणूस आरपार जाणवतो.

वार्ताहराचे धबडग्याचे काम करतानाही नीलाताईंनी कशाबशा खरडलेल्या कथा किती कसदार आहेत हे त्यांच्या ती आणि त्या या कथासंग्रहाला ज्येष्ठ कथाकार शांताराम (के.ज. पुरोहित) यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेवरून दिसून येते. ज्यांनी असे प्रगल्भ कथासंग्रह अधिक द्यावेत, असे आजमितीला ज्यांच्याबद्दल मला वाटते अशा आठ-दहा लेखक लेखिकांत नीला उपाध्ये यांची गणना मी निश्चित करेन अशी मनमोकळी दाद त्यांनी त्या प्रस्तावनेत दिली आहे.

पूर्णवेळ राजकीय पत्रकारीता करणारी पहिली मराठी महिला वार्ताहर ठरलेल्या नीलाताईंनी चित्रपश्चिमा हे विदेशी चित्रपट समिक्षणाचे सदर पंधरा वर्षे इतक्या समर्थपणे सांभाळले की, त्यायोगे 'चित्रपश्चिमा'कार अशी एक नवी ओळख त्यांना मिळाली.

अभ्यासपूर्ण बहारदार सांस्कृतिक वृत्तांकन हा वार्ताहर नीलाताईंचा बालेकिल्ला! मर्ढेकर, खांडेकर, गंगाधर गाडगीळ, पु.ल. देशपांडे प्रभृतीच्या साहित्यावरील चर्चासत्रे, मुलाखती यांचे नीलाताईंनी केलेले वार्तांकन त्यांचा सखोल वाड्मयीन अभ्यास दर्शवतात.

नीलाताईंचा आणखी एक आवडीचा विषय म्हणजे पुरातत्त्वशास्त्र व इतिहास! मीठागरे, भातशेती व खाडीतील मासेमारी या आम्हा आगरी समाजाच्या सर्वमान्य पारंपरिक उद्योगांखेरीज विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आम्ही मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यात ज्या चुनाभट्ट्या चालवल्या, त्यातून उत्पादित चुन्यातुनच जुन्या मुंबईतील कापड गिरण्या, रुग्णालये वगैरे इमारती. बांधल्या गेल्या, असे प्रतिपादन करणारे संशोधन नीलाताईंनी केले. या संशोधनासाठी त्यांना मुंबईतल्या एशियाटिक सोसायटीची प्रतिष्ठेची रिसर्च तेलंग फेलोशिपही मिळाली होती. या संशोधनावर आधारित पुढे त्यांनी चुनाभट्ट्यांचा इतिहास व आगरी समाज हे पुस्तक लिहिले. त्याचा प्रकाशन समारंभ आमच्या दर्पण प्रकाशनतर्फे मुंबई मराठी पत्रकार संघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, समाजनेते जगन्नाथ पाटील, इतिहास संशोधक रवींद्र लाड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. ते पुस्तकही इतके लोकप्रिय झाले की त्याची पहिली आवृत्ती हातोहात संपली.

अशा या नीलाताई! त्यांची लेखणी हुकमी होती. तिला कुठलाही विषय वर्ज्य नव्हता. बंद पडलेल्या स्वदेशी मिलच्या कामगारांच्या व्यथांपासून पर्यटनस्थळी बेजबाबदारपणे वागून मृत्यूला कवटाळलेल्या पर्यटकांच्या दु:खी कुटुंबियांच्या व्यथांपर्यंत, सण-उत्सवांच्या वाढत्या बाजारीकरणापर्यत कुठलाही विषय त्यांच्या व्यासंगी लेखणीला वर्ज्य नव्हता. त्यामुळेच अनेक दैनिकात, नियतकालिकात, दिवाळी अंकात नीलाताईंनी आपले अभ्यासपूर्ण संदर्भबहुल लेख लिहिले. त्यांच्या ७०व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या या सर्व साहित्याचा आढावा घेणारा, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणारा ३३३ पानांचा ग्रंथ संपादित करण्याची संधी मला मिळाली. त्यामुळे त्यांच्या लेखनाचा अभ्यास करता आला.

त्यांचा नि आमचा अगदी कौटुंबिक संबंध होता. त्या अनेकदा आमच्या चुनाभट्टी येथील घरी येत असत. आम्हा कुटुंबातील प्रत्येकाची आस्थेने चौकशी करीत. त्यानंतर गप्पागोष्टी होत. माझ्या पत्नीशी त्यांचे चांगले सूत जमले होते. तिच्या वाढदिवसाला त्या हमखास येत इतके घनिष्ठ संबंध होते.

नीलाताई उत्कृष्ट परीक्षकही होत्या. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे सन २००१पासून सुरू असलेल्या राज्यस्तरीय उत्कृष्ट दिवाळी अंक स्पर्धेच्या त्या गेली २० वर्षे प्रमुख परीक्षक होत्या. अत्यंत चिकित्सक पद्धतीने परीक्षण करून त्या निर्णय देत असत. सीकेटी महाविद्यालयात मराठी वृत्तपत्र विद्या अभ्यासक्रमाच्या समन्वयक म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांच्या निधनाने असे हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व आपल्यातून हरपले आहे. त्या गेल्या, पण त्यांनी केलेल्या कामाचा ठसा अनंत काळ स्मरणात राहील.

**-दीपक म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार**



नीलाताईंच्या ७०व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सामाजिक कृतज्ञता सोहळा साजरा करण्यात आला. त्या कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते झाले. त्या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, नीलाताईंची बहीण शैलाताई घरत, ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे हेही उपस्थित होते.



चुनाभट्ट्यांचा इतिहास आणि आगरी समाज या नीलाताईंच्या पुस्तकांचे प्रकाशन करताना मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, जगन्नाथ पाटील, रवींद्र लाड, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, नीलाताई, दशरथदादा पाटील, जे.डी.तांडेल, प्रकाशक दीपक म्हात्रे आदी मान्यवर.



चुनाभट्ट्यांचा इतिहास आणि आगरी समाज या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात समाजनेते जगन्नाथ पाटील यांचे स्वागत करताना नीलाताई उपाध्ये. सोबत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, दशरथदादा पाटील व अन्य मान्यवर.

# पुनर्वसित इर्शाळवाडीत हक्काचे घर

## अनाथ चिमुकल्या मुलींनी केला गृहप्रवेश

**चौक : प्रतिनिधी**

दसऱ्याच्या पूर्वसंध्येला इर्शाळवाडी या नवी पुनर्वसन झालेल्या गावांतील घरात प्रत्यक्ष प्रवेश करण्यात आला. या वेळी अनेकजण भावनाविवश झाले होते, तर काहींनी अश्रूंना धाय मोकळीक करून दिली होती.






मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई येथील एका सार्वजनिक कार्यक्रमात इरसाल वाडी दरडग्रस्त यांना नवीन घरांच्या चाव्या सुपूर्द केल्या, पण सायंकाळी मुख्यमंत्री मदत पुनर्वसन कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, सिडकोचे वरीष्ठ अधिकारी, बीजे शिर्के कंपनीचे अधिकारी, सरपंच रितू ठोंबरे, मंडळ अधिकारी सानप, ग्रामपंचायत अधिकारी शंकर जाधव, आदिवासी नेते अंकुश वाघ, दरडग्रस्त यांचे वारस यांच्या प्रत्यक्ष उस्थितीत गृह प्रवेश करण्यात आला. १९ जुलै २०२३ रोजी रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात व माथेरान च्या बरोबरीत असलेल्या इर्शाळवाडीची मोठी दुर्घटना घडली. इर्शाळवाडीचा डोंगर कोसळून भूस्खलन झाले होते. यात ८४ जणांचे जीव गेले. ८३ जनावरे दगावली. ४९ घरे आणि ७ गुरांचे गोठे कायमचे जमीनदोस्त झाले. याठिकाणी कोणतेही साधन जात नाही. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वतः डोंगर चढून दुर्घटनास्थळी पोहचले होते.

दसऱ्याच्या पूर्व संध्येला आपल्या नवीन हक्काची चावी मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर आहे, पण आपली माणसे आपल्यात नाहीत, याचेही दुखः त्यांच्याकडे बोलताना, पाहताना दिसत होते. दोन चिमुकल्या यांनी आपले सर्वस्व गमावले आहे. एवढ्या मोठ्या घरात दोघी राहणार आहेत. भरत राघो दोरे हा कर्जत तालुक्यातील नेरळ माणगाव येथे वसतिगृहात शिकत असल्याने तो या दुर्घटनेतून वाचला. आपले आई बाबा, मोठा भाऊ, वहिनी आणि वहिनीच्या पोटात असलेले सात महिन्यांचे बाळ गमावल्याने तो अतिशय दुःखी होता. आज शाळेतील शिक्षकांचे सहकार्याने तो चावी घेण्यास आला,चावी घेणार, घराला परत कुलूप लावणार आणि सकाळी शाळेत जाणार हे सांगताना त्याच्या डोळ्यात अश्रू अनावर झाले होते.

### नवीन घरांसह सभोवताली सुविधा

*मृत्यू पावलेल्या ८४ जणांच्या नावाची पाटी लावण्यात आली आहे. प्रत्येक झाडाला ट्री गार्ड लावण्यात आले, मुलांना खेळण्यासाठी पाळणा, खेळणी सर्व उपलब्ध आहेत. पक्के घर, घराच्या आसपास परस बाग, मोठे रस्ते, सर्व सुविधा उपलब्ध आहेत, विज पुरवठा, शौचालय, स्नानगृह, गटार, अंगणवाडी, शाळा, दवाखाना, गुरांचा गोठा, समाजमंदिर,४४ घरे पूर्ण झाली आहेत.*

# पेणमध्ये परतीच्या पावसामुळे भातकापणीची कामे ठप्प

### शेतकऱ्यांना फटका



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यामध्ये गेल्या आठ दिवस परतीच्या पावसाने चांगलाच धुमाकूळ घातला असून त्यामुळे भातकापणीची कामे ठप्प झाली होती. या परतीचा पावसाचा फटका शेतकरी बांधवांना बसला आहे.

परतीच्या पावसामुळे अनेक शेतकऱ्यांच्या भातपिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तयार झालेले भातपीक जमीनदोस्त झाले. अनेक शेतकऱ्यांनी भाताची कापणी सुरू केली आहे, मात्र पुन्हा अवेळी पावसाच्या भीतीने शेतकरीवर्ग चिंतेमध्ये आहे. ३ ते ४ दिवसांच्या या पावसाच्या विश्रांतीमुळे तालुक्यात शेतकऱ्यांची मोठ्या जोराने हळवी भाताची शेती कापणीस जरी सुरुवात केली असली तरी आजही या शेतकऱ्यांसमोर अवेळी पावसाच्या भीती व्यतिरिक्त शेतीमध्ये आजही तुंबलेले पाणी, कापणीनंतर भात सुकवणीचा प्रश्न तसेच मजुरांचा प्रश्न कायम आहेत. सध्या शेतकरी भात पीक येऊनदेखील पुन्हा पावसामुळे अडचणीतच आहे.

पेण तालुक्याच्या अनेक ठिकाणी भात कापणी सुरू झाली आहे. शेतातील पाण्याचा विचार न करता शेतीची कापणी करून शेताच्या बांधावर कापलेले भात सुकविण्याचे काम सुरू आहे. काही ठिकाणी आजही शेतामध्ये एवढे पाणी आहे की कापणी करू शकत नाही, यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. अवेळी पावसामुळे दरवर्षी भात पिकाचे नुकसान होत असले तरी शासकीय नियमामध्ये पावसाचे प्रमाण बसत नसल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत नाही.

पेण तालुक्यात सप्टेंबर अखेरीपासून भातपीक परिपक्व होण्यास सुरुवात होते. त्यानंतर गेल्या पंधरा दिवसांत तर जिल्ह्यातील सुमारे ७५ टक्के भातपीक परिपक्व झाले आहे, परंतु सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांना भात कापणी करता आलेली नाही. अनेक शेतकऱ्यांचे भातपीक पावसामुळे जमिनीवर आडवे झाले आहेत, अशी प्रतिक्रिया शेतकरी दत्ता म्हात्रे यांनी दिली.

# माथेरानमध्ये तालुक्यातील धनगर समाजाचा मेळावा

**माथेरान : प्रतिनिधी**

विजयादशमीच्या शुभदिनी कर्जत तालुक्यातील हरहर चांगभले समाजाचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला. माथेरान धनगर समाजाचे शहर अध्यक्ष दीपेश ढेबे, महिला अध्यक्षा संगीता रामचंद्र ढेबे यांच्या माध्यमातून या मेळाव्याचे आयोजन केले होते.



माथेरान उदयास येण्यापूर्वी ब्रिटिशांना घेऊन एक धनगर या टापूवर आला होता. तसेच पूर्वी धनगरांची गाय मंदिराच्या ठिकाणी पान्हा सोडत होती. त्यामुळे येथे पिसारनाथ मंदिरावर पुजारी म्हणून धनगराला मान दिला जातो. यामुळे दरवर्षी समाजाच्या वतीने दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर मंदिरात पूजा केली जाते. यंदाही पिसारनाथ मंदिरात १२ ऑक्टोबर रोजी विजयादशमीला सकाळी ९ वाजता यथोचित पूजा करण्यात आली. सकाळी साढे दहा वाजता पुण्यस्मरण अहिल्याबाई होळकर चौकातून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली.

या मिरवणुकत कर्जत तालुक्यातील समाजबांधव मोठ्या संख्येने हजर होते. येळकोट येळकोट जयमल्हारच्या घोषणा देत ढोलताशांच्या गजरात पिवळी हळद उधळत येथील मध्यवर्ती ठिकाण श्रीराम चौक येथे धनगरी नृत्याविष्कार दाखवत साढे बारा वाजता ही मिरवणूक पिसारनाथ मंदिराच्या दिशेने कूच करत निघाली.

या वेळी येणारे पर्यटक देखील या आनंदात सहभागी झाले होते. त्यांनी पण ढोलताशांच्या गजरात ठेका धरला होता. समाज बांधवांच्या पारंपरिक गजानृत्याने सर्व पर्यटकांचेही लक्ष वेधून घेतले होते.दुपारी अंदाजे दोन वाजता या मिरवणुकीची पिसारनाथ मंदिरामध्ये देवाची आरती करून या मेळाव्याची सांगता करण्यात आली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राकेश कोकळे, प्रवीण बावदाने, करण जानकर, तालुकाध्यक्ष तुकाराम आखाडे यांनी विशेष मेहनत घेऊन मेळावा यशस्वी केला.

# 'कामगारांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा'

**रोहे : प्रतिनिधी**

असंघटित कामगारांसाठी शासनाच्या विविध योजना आहेत.त्या योजनेचा लाभ घेण्यासाठी घरेलू कामगार व बांधकाम कामगार यांनी जास्तीत जास्त नोंदणी करावी, असे आवाहन महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.



बांधकाम कामगार महासंघ व घरेलु कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघ जिल्हा रायगड यांच्या माध्यमातून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मडळ आणि घरेलू कामगार मंडळ यांच्याकरिता भांडी वाटप व कीट वाटप कार्यक्रमप्रसंगी रोहा शासकीय विश्रामगृह येथे महिला व बालकल्याण मंत्री. आदिती तटकरे मार्गदर्शन करताना बोलत होते.

या वेळी राष्ट्रवादी जिल्हा राष्ट्रवादी सरचिटणीस सुरेश मगर, भारतीय मजदूर संघ रायगड सचिव अशोक निकम, सौ सीमा साबळे, गजानन जोंधळे, भारतीय मजदूर संघ रायगड अध्यक्ष संदीप मगर, बांधकाम कामगार महासंघ रायगड अध्यक्ष विकास सुतार, अजित तलाठी, निर्मला भूतकर, शुभांगी बाकाडे आदी उपस्थित होते.

या वेळी घरेलू कामगार व बांधकाम कामगारांना साहित्य मिळत असल्याने भारतीय मजदूर संघाच्या वतीने शासनाचे मनपूर्वक आभार यावेळी मी व्यक्त करत असल्याचे अशोक निकम यांनी सांगितले. सूत्रसंचालन अशोक निकम यांनी केले.



**माणगाव : तळा येथील चंडिकादेवीच्या नवरात्र उत्सवानिमित्त भाजपच्या कोकण विभागीय संघटिका शर्मिला सत्वे व शिवाजी सत्वे यांनी दर्शन घेतले.**


### जाहीर नोटीस

**गृहलक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित** या संस्थेच्या इमारत पुर्नबांधणी कामाकरिता नामांकित तज्ञ आर्किटेक्ट, प्रकल्प व्यवस्थापन सल्लगाराची (PMC) करिता सिलबंद निविदा मागवित आहोत. इच्छुक व्यावसायिकांनी सदर निविदा खालील दिलेल्या पत्त्यावर दिनांक १४/१०/२०२४ वे दि.२०/१०/२०२४ पर्यत सादर कराव्यात.

दिनांक :- १२/१०/२०२४

सही/- मा. चेअरमन
सही/- सेक्टरी

गृहलक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
एमआयडीसी वसाहत, मोहोपाडा, प्रिया स्कूल जवळ, प्लॉट नं. आरडब्ल्यू ०७, ता. खालापूर, जि. रायगड ४१०२२२


# वाघोलीतील ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या वास्तूचे लोकार्पण



**नागोठणे : बातमीदार**

अलिबाग तालुक्यातील कामार्ले विभाग वाघोलीच्या ज्येष्ठ नागरिक संस्थेने सुमारे ६० लाख रुपये मूल्याची टुमदार वास्तू उभारली असून या वास्तूचा लोकार्पण सोहळा झाला. या वेळी आमदार महेंद्र दळवी यांची उपस्थिती लाभली.

संस्थेचे सल्लागार बळवंत वालेकर, ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर, अच्युत पाटील, सुधाकर पाटील, संस्थेचे अध्यक्ष दामोदर ठाकूर, उपाध्यक्ष नंदकुमार पाटील, सेक्रेटरी दत्तात्रेय नांदेकर, खजिनदार जनार्दन पाटील, मधुकर पाटील, प्रकाश पाटील, चंद्रकांत वालेकर तसेच उद्योजक लायन अनिल म्हात्रे व कीर्ती शहा, ग्रामविकास अधिकारी जायस्वाल, वैभव पाटील, जिल्हा नियोजन समिती सदस्य संतोष निगडे, विजय पाटील, नारायण गायकवाड, ब. रा. वाघपंजे, सुनिल डबरे, जयवंत थळे, शशिकांत कवळे, वसंत पाटील, पुष्पा पाटील, लिलाबाई पाटील, नंदा नांदेकर आदी उपस्थित होते.

# डॉ. सुरेखा पाटील यांची निवड

**पेण : प्रतिनिधी**

सुहित जीवन ट्रस्ट पेणच्या संस्थापिका व अध्यक्षा डॉ. सुरेखा पाटील यांची महाराष्ट्र राज्य सल्लागार मंडळावर दिव्यांग तसेच पुनर्वसन या क्षेत्रामधील तज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



दिव्यांगांच्या क्षेत्रात गेली २६वर्षे उत्कृष्ट कार्य करूप विविध शैक्षणिक, सामाजिक, कला, क्रिडा, कौशल्य या विविध क्षेत्रातील विशेष विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी सुरेखा पाटील या सतत प्रयत्नशील असतात. त्यामुळे त्यांची दीव्यांग मंडळावर सल्लागार पदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल समाजातील विविध स्तरांतून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे. या वेळी सुहित परिवाराकडूनही त्यांचे अभिनंदन करण्यात आले.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRME-TENDER NOTICE**

The Executive Engineer EHV (O&M) Division Jalna on behalf of MSETCL (The Employer) invites online bids (SRME-Tender) from reputed & registered agency on mahatransco SRME-Tendering website https://srmetender.mahatransco.in/irj/portal for following works.

| Sr. No. | Particular of Works | Tender No. |
|---|---|---|
| 1. | 3rd Call for Work of Annual maintenance contract for the work of Repairs/Servicing & replacement of various transformer's and ICT's cooling fans along with FCC Cubicles at various 132 kV & 220 kV Substations under EHV (O&M) Division, Jalna. | 7000034105 |

For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/irj/portal contact person: The Dy. Executive Engineer (O): Mob: - 9763507541. The undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Executive Engineer**
**EHV (O&M) Division, MSETCL, Jalna**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRME-TENDER NOTICE**

The Executive Engineer EHV (O&M) Division Jalna on behalf of MSETCL (The Employer) invites online bids (SRME-Tender) from reputed & registered agency on mahatransco SRME-Tendering website https://srmetender.mahatransco.in/irj/portal for following works.

| Sr. No. | Particular of Works | Tender No. |
|---|---|---|
| 1. | 3rd Call for Work of providing and fixing of 220 kV &132 Moving Blade, Earth Blade to the 220 kV & 132 kV Isolators in various bays at 220 kV Nagewadi S/s, under EHV O&M Division, Jalna | 7000033451 |

For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/irj/portal contact person: The Dy. Executive Engineer (O): Mob: - 9763507541. The undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Executive Engineer**
**EHV (O&M) Division, MSETCL, Jalna**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

ई निविदा सूचना क्र.४२/२०२४-२०२५ (मुंबई) करीता

दिनांक ०४/१०/२०२४ रोजी दैनिक मुंबई चौफेर, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजितरक्कम |
|---|---|---|
| १. | रोहा औद्यागिक क्षेत्राजवळील किल्ला गावामधील रस्त्यांचे डांबरीकरण व कॉंक्रिटीकरणाद्वारे मजबुतीकरण करणे. | ₹२,६६,१८,७८७.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २१/१०/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.


# पालीतील ओसवाल प्लाझामध्ये विविध कार्यक्रम

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पाली येथील ओसवाल प्लाझामध्ये एकमेव श्री संतोषी मातेचे मंदिर उभारले आहे. पालीतील याच ओसवाल प्लाझामध्ये घट स्थापनेपासून नवरात्रोत्सवाची मोठी धूम पहावयास मिळाली. श्री संतोषी माता मंदिरात अत्यंत भक्तिमय वातावरण दिसून आले.



लहान, थोर, तरुण आबालवृद्ध सारेच मोठ्या उत्साहाने या सणात सहभागी होताना दिसले. याठिकाणी विविध सांस्कृतिक स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, संगीत खुर्ची, होम मिनिस्टर, पैठणी असे कार्यक्रम झाले.

महिलांना गरबा नृत्यात सहभागी होता यावे यासाठी सामूहिक भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

एकूणच नवरात्रोत्सवात सारेजण एकत्र येतात, यानिमित्त एकता बंधुत्व आणि मैत्रिभाव जपला गेला. सारे गुण्यागोविंदाने आणि सुखाने एकोप्याने राहावेत, सर्वांना सुख वैभव आणि मांगल्य लाभावे अशीच प्रार्थना श्री संतोषी माता यांच्या चरणी भाविक भक्तगण नागरिक करीत आहेत.

# निवडक

## एनएमएमटी पुन्हा सुरू करण्याची मागणी



**उरण** : अनेक महिन्यांपासून उरणमध्ये एनएमएमटी परिवहनची बससेवा बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे नवी मुंबईमध्ये प्रवास करणाऱ्या विद्यार्थी, व्यापारी, नोकरदारांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. हे निवेदन स्विकारून प्रवाशांच्या समस्या लक्षात घेऊ न नवी मुंबई महापालिकाचे आयुक्त कैलास शिंदे यांनी लवकरत लवकर एनएमएमटीची बससेवा चालू होईल, असे आश्वासन कार्यकर्त्यांना दिले. निवेदन देताना उरण शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश पाटील, अभय वेद पाठक, माजी नगरसेविका आफशा मुकारी, अकबर नदाफ, चंदा मेवती, मोहनसिंग खरवड आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## वंदना तारुचे एलएलबीत सुयश

**मोहोपाडा** : रसायनीतील वंदना नामदेव तारु हिने बिएलएस एलएलबी परिक्षेत प्रथम श्रेणीत सुयश संपादन केले आहे.



वंदना ही भागूबाई चांगू ठाकूर लॉ कॉलेजात पाच वर्षाचा पदवी अभ्यासक्रम करून तिने प्रथम क्रमांकाने प्रथम श्रेणीत एलएलबी उत्तीर्ण केली आहे. तिला बिए एलएलबी कोर्डीनेटर धनश्री कदम, लॉ कॉलेजचे मुख्याध्यापक सानवी देशमुख, चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते एलएलबी पदवी बहाल करण्यात आली. या वेळी वाय. टी. देशमुख, अनॅन मैदगीकर, एसटी गोडबोले आदी उपस्थित होते. वंदना तारु यांना एलएलबी परिक्षेत सुयश संपादन केल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मोबाईलचोर पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल** : करंजाडे वसाहतीतून महागडे सहा मोबाईल चोरणाऱ्या दोन अल्पवयीन मुलांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. करंजाडे वसाहत परिसरात गेल्या काही दिवसापासून मोबाईल चोरीचे प्रकार वाढले होते. या संदर्भात पोलिसांच्या पथकाने तांत्रिक तपासाद्वारे माहिती घेत असताना त्यांना करंजाडे परिसरातील दोन अल्पवयीन मुलांसंदर्भात माहिती मिळाली. त्यानुसार या दोन मुलांना ताब्यात घेऊन अधिक तपासामध्ये त्यांनी चोरलेले सहा मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले आहेत.

## रेल्वेच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**पनवेल** : कॉलेजला जाणाऱ्या १८ वर्षीय तरुणाला रेल्वेची धडक लागल्याने झालेल्या अपघातात रितेश जयदास मुंडकर (रा. बंबावीपाडा, वहाळ) याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी रितेश मुंडकर कॉलेजला जात होता. बंबावीपाडा रेल्वे ट्रॅकजवळ क्रॉस करताना पनवेलकडे जाणाऱ्या रेल्वेची धडक रितेश मुंडकरला लागली. या झालेल्या अपघातात रितेश मुंडकर हा गंभीर जखमी झाला. त्याला गांधी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली.

## अपघातात मुलाचा मृत्यू

**पनवेल** : दुचाकीने भरधाव वेगाने येऊन कारला धडक दिल्याने झालेल्या अपघातात मुलाचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी अर्जुन काळू होला याच्याविरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अर्जुन काळू होला हा एक महिला आणि तिचा मुलगा (वय अंदाजे पाच वर्ष) यांना मोटरसायकलवर पाठीमागे बसवून खोपोलीकडून पनवेलकडे येणाऱ्या रस्त्याने वाहतुकीच्या विरुद्ध दिशेने भरधाव वेगाने येत होता. या वेळी दांडफाटा येथे कारला धडक दिली. या अपघातात मोटरसायकलच्या पाठीमागे बसलेली अनोळखी महिला आणि पायी जाणारा तुषार तिरुके यांना गंभीर दुखापती झाल्या. हे दोघेही बेशुद्ध असल्याची माहिती पोलिसांनी दिली तसेच या अनोळखी महिलेचा पाच वर्षीय मुलगा याचा या अपघातात मृत्यू झाला. अपघाताप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## मोबाईल चोरटा पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल** : तक्का येथील एका राहत्या घरातून व परिसरातून चार मोबाईल चोरणाऱ्या सराईत मोबाईल चोरट्यास शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तक्का परिसरातील एका घरातून आरोपी ताजुउद्दीन अल्लाउद्दीन अन्सारी (२४ रा.गोवंडी) याने मोबाईल चोरले होते. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलिसांच्या पथकाने तांत्रिक तपासाद्वारे व गुप्त बातमीदाराद्वारे माहिती घेतली. तेव्हर आरोपी हा गोवंडी येथे लपल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तेथे सापळा रचून त्याला ताब्यात घेतले व त्याच्याकडून गुन्ह्यातील एक मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला असून इतर मोबाईलचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.



करंजाडे : येथील क्रिश्ना हार्मोनी सोसायटीतील देवी.

# परतीच्या पावसाचा भातशेतीला तडाखा

## पिकांचे नुकसान; शेतकरी चिंतेत

**उरण : प्रतिनिधी**



बऱ्याच दिवसापासून विश्रांती घेतलेल्या परतीच्या पावसाने बुधवारी दुपारी ढगांच्या गडगडाट, विजांच्या कडकडाटासह हजेरी लावली. या अचानक आलेल्या पावसामुळे खाचरातील भातपिके शेतात साचलेल्या गुडघाभर पाण्यात आडवी झाली आहेत. त्यामुळे उरण तालुक्यातील भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सर्वत्र सुरू असलेल्या नवरात्रोत्सवात पावसाचा व्यत्यय ठरत असून गरबाप्रेमींमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

सध्या या भागात बऱ्याच ठिकाणी भातशेती कापणीचा हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे कोठे कापणी सुरू आहे, तर कुठे भाताची मळणी सुरू आहे. आदिवासी वाड्यांमध्ये नाचणी, वरी या पिकांची कापणी सुरू आहे, मात्र आज अचानक आलेल्या पावसाने ऐन कापणीच्या मोसमात हजेरी लावल्याने शेतकऱ्यांची मेहनत वाया जात असून शेतकरी वर्ग चिंतेत आहे. या भागात बऱ्याच ठिकाणच्या भातखाचरातील भाताचे पीक पूर्णपणे तयार झाले आहे. काही ठिकाणी भातपिके दाणे भरण्याच्या अवस्थेत आहेत.

ज्या भात खाचरात भातपिके तयार झाली आहेत अशी पिके शेतकऱ्यांनी कापून शेतात सुकवायला ठेवली आहेत, तर काही ठिकाणी भाताची मळणी सुरू आहे, परंतु अचानक हस्त नक्षत्राच्या पावसाने ऐन कापणीच्या मोसमात हजेरी लावल्याने भातपिके शेतात भिजून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची मेहनत वाया जात असून, शेतकरी वर्ग चिंतेत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून नेण्याची भीती शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

नवरात्र उत्सवातील दांडीया, गरबा खेळावरही परिणाम झाला असून, अनेक गरबा प्रेमींमध्ये नाराजीचा सूर उमटले.

> **अचानक आलेल्या हस्त नक्षत्राच्या पावसामुळे शेतातील भातपिके आडवी झाली आहेत. त्यामुळे पाऊस थांबला नाही, तर शेतात आडवी झालेली भातपिके कुजून जाण्याची शक्यता आहे.**
> **–दीपक पाटील, शेतकरी, चिरनेर**

## बँक खात्याच्या केवायसीचा बहाणा करून ऑनलाईन गंडा

**पनवेल : वार्ताहर**

बँक खात्याचे केवायसी अपडेट करण्याबाबत सांगून बारा लाख ७७ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

रिता सिन्हा या खारघर सेक्टर २१ येथे राहत असून त्यांना अनोळखी व्यक्तीने कॉल करून ॲक्सिस बँकेतून दीपक शर्मा बोलत असल्याचे सांगितले. आणि केवायसी अपडेट नसून ते तुम्हाला अपडेट करावे लागेल नाहीतर साडेतीन हजार रुपये दंड भरावे लागेल असे सांगितले. या वेळी मोबाईलवर एक लिंक पाठवली आणि ती लिंक ओपन करून केवायसी अपडेट करण्यास सांगितले. लिंक ओपन केली असता त्या ऑप्शन भरत गेल्या आणि पॅन कार्ड अटॅच केले. ह्यावेळी त्यांच्या बचत खात्यातून पाच लाख रुपये डेबिट झाल्याचा मेसेज आला. त्यानंतर पुन्हा पाच लाख डेबिट झाल्याचा मेसेज आला.

काही वेळाने दोन लाख ७७ हजार रुपये डेबिटचा मेसेज प्राप्त झाला. या वेळी ॲक्सिस बँकेच्या कस्टमर केअरला फोन केला असता त्यांनी १९३० नंबर वर कॉल करून तक्रार करण्यास सांगितले. बारा लाख ७७ हजार रुपये रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## कार अपघातात एक ठार; चौघे जखमी

**पनवेल** : ब्रेक दाबण्याऐवजी एक्सलेटर दाबल्यामुळे गाडी रस्त्याच्या दुभाजकाला धडकून उलटल्याने झालेल्या अपघातात गाडीतील एक जण ठार तर इतर चार जखमी झाल्याची घटना खारघर येथे घडली आहे.

कार चालक अर्णव बिरारी, पक्ष सावरिया, यश मोया, अग्रीम पराशर व दर्श जैन हे पाच जण खारघर पेठपाडा येथील कॉलेजमध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरिंगच्या पहिल्या वर्षाचे शिक्षण घेत आहेत. यातील अर्णव बिरारी या विद्यार्थ्याने त्याच्या वडिलांची गाडी कॉलेजमध्ये आणली होती. त्यानंतर हे पाचही जण गाडीतून खारघरमधून फेरफटका मारण्यासाठी गेले. या वेळी अर्णव गुरुद्वारासमोरील रोडवरून जात असताना त्याने रस्त्यावरील खड्डा चुकविण्याचा प्रयत्न केला.

यासाठी त्याने कारचे स्टेअरिंग उजव्या बाजूस वळविले असता ही गाडी रस्ता दुभाजकाला घासली तेव्हा अर्णवने ब्रेक दाबण्याऐवजी एक्सलेटर दाबले. त्यामुळे कार रस्त्याच्या दुभाजकाला जाऊन जोरदार आदळली व पलटल्याने झालेल्या अपघातात दर्श जैन हा गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. तर त्याचे इतर चार मित्र जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## करंजाडेतून मुलाचे अपहरण

**पनवेल** : राहत्या घराच्या परिसरातून बारा वर्षीय मुलाचे अपहरण केल्याप्रकरणी आरोपीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अनिता पांडे ह्या सेक्टर सहा, करंजाडे येथे राहत असून त्यांच्या बहिणीची मुले त्यांच्यासोबत राहतात. त्यांना रात्री तीन वाजता जाग आली त्यावेळेस सुरज दिसून आला नाही. त्याचा परिसरात शोध घेतला मात्र सापडून आला नाही. अज्ञात व्यक्तीने सुरज अनिल तिवारी याचे अपहरण केले.

## सिमेंटच्या बाकावरून पडून चिमुकल्याचा मृत्यू

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिमेंटच्या बाकावरून खाली पडल्याने चार वर्षीय तेजस साकेत पटेल (रा. स्वप्नपूर्ती बिल्डिंग, खारघर) याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली.

स्वप्नपूर्ती सोसायटी येथे नवरात्र उत्सवाला प्राची पटेल आणि त्यांचा मुलगा तेजस हे गेले होते. सोसायटीमध्ये सार्वजनिक नवरात्र उत्सव असल्याने गरबा बघण्यासाठी तेथे असलेल्या सिमेंटच्या बाकावर खेळत असताना त्याचा तोल गेला आणि तो डोक्यावर पडल्याने त्याच्या डोक्याला मार लागला. त्याच्या डोक्यातून आणि कानातून रक्तस्त्राव झाला. त्याला मैत्री हॉस्पिटल येथे नेण्यात आले. त्यानंतर त्याला एमजीएम हॉस्पिटल बेलापूर येथे नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. तेजस पटेल यांच्या मृत्यूची नोंद खारघर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली.





नवीन पनवेल : येथे महापालिकेच्या माध्यमातून वृक्षछाटणी केल्यानंतर तोडलेले वृक्ष हे फुटपाथवर पडलेले होते. याबद्दल माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेविका व भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस वृषाली वाघमारे यांनी आयुक्तांना निवेदन दिले. त्यानंतर संबंधित विभागाने लक्ष देऊन फुटपाथवर पडलेली झाडे उचलण्यात आली.



**नवीन पनवेल : पद्मनाभ व मुग्धा भागवत यांच्या घरातील महालक्ष्मी! या देवीचे वैशिष्ट्य म्हणजे तिचा मुखवटा तांदळाच्या पिठाची उकड काढून तयार केला जातो. अष्टमीच्या दिवशी याची स्थापना करून मध्यरात्री घागरी फुंकण्याचा कुळाचार आहे.** (छाया : श्रीनिवास काजरेकर)



## दुर्गामाता दौड (सांगता)

पनवेल : दसऱ्याच्या दिवशी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेलचे धारकरी संपूर्ण पनवेलमध्ये श्री दुर्गामाता महादौड काढतात. आजच्या दौडमध्ये आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. दौड संपूर्ण पनवेलमध्ये फिरवण्यात आली. यानंतर दौड गावदेवीच्या मंदिरात आली. तेथे आरती आणि श्लोक घेण्यात आले व पुन्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकजवळ येत धेयमंत्र घेऊन दौडची सांगता करण्यात आली.















पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तालुक्यातील ठिकठिकाणच्या देवींचे दर्शन घेतले. या वेळी आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ.

# विरोधकांच्या अपप्रचाराला बळी पडू नका

## मुरूडमधील प्रस्तावित आरसीएफ प्रकल्पावरून आमदार दळवींचे स्थानिकांना आवाहन



**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात येऊ घातलेल्या नवनवीन प्रकल्पांना काही राजकीय पक्ष विरोध दर्शवत आहेत. यामुळे विकासाला खिळ बसते. मुरूड तालुक्यात आरसीएफचा प्रकल्प मंजूर झाला असून हजारो बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळणार आहे. या प्रकल्पाबद्दल विरोधकांच्या अपप्रचाराला बळी न पडता ग्रामीण जनतेने पाठिंबा द्यावा, असे आवाहन अलिबाग मुरूड मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांनी केले.

मुरूड तालुक्यातील तळेखार ग्रामपंचायत येथील मरिआई मंदिराच्या प्रांगणात आयोजित संवाद मेळाव्यात आामदार दळवी बोलत होते.

या वेळी मेळाव्यास तळेखार ग्रामपंचायतीचे सरपंच विजय घाणेकर, जिल्हा संघटक दिनेश मिनमिणे, मुरूड तालुका संघटक यशवंत पाटील, उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, उपतालुकाप्रमुख भगिरथ पाटील, विघ्नेश माळी, तालुका युवा नेते दिपेश वरणकर, माजी पं.स. सभापती चंद्रकांत, उपसरपंच निलेश तांबडकर आदी उपस्थित होते .


या वेळी शिवसेनेचे कार्यकर्ते विघ्नेश माळी यांनी आमदार महेंद दळवी यांच्या प्रेरणेतून तळेखार ग्रामपंचायतीच्या विकासकामांचा आढावा घेत आमदारांनी स्वःखर्चातून आठ टन स्टील व १५ लाखांची मार्बल लादी ग्रामस्थ मंडळाला दिल्याचे सांगितले.

या वेळी तळेखार ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांनी आगामी निवडणुकीत आमदार दळवी यांच्या भरभक्कम पाठीशी राहून विजयी करू, असा निर्धार व्यक्त केला.

# चला यशस्वी होऊ कार्यक्रमास प्रतिसाद

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आकार प्रतिष्ठानतर्फे पोलादपूर तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन पोलादपूर येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये करण्यात आले होते. तालुक्यातील असंख्य विद्यार्थ्यांचा या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिराचे उद्घाटन महाड येथील ज्येष्ठ साहित्यिक सुधीर शेठ यांच्या हस्ते झाले.



पोलादपूर तालुक्यातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक प्रशालांच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विवेक मेहेत्रे यांचा चला यशस्वी होऊ या कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी संगणकाद्वारे प्रोजेक्टरवरून मोठ्या पडद्यावर व्हिडीओ क्लीप्स आणि पॉवरपॉईट प्रोजेक्टसद्वारे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यास व शैक्षणिक तसेच जीवनातील यशासाठी प्रोत्साहनपर मार्गदर्शन विवेक मेहेत्रे यांनी केले. या वेळी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त महाप्रबंधक सुनील चव्हाण यांचेही विद्यार्थ्यांसाठी बँकेच्या विविध शैक्षणिक कर्जाबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय सलागरे, उपाध्यक्ष रामदास सकपाळ, सचिव राजाराम शेलार, खजिनदार रविकांत सकपाळ, सहखजिनदार सुनील चव्हाण, सहसचिव ज्ञानेश्वर उतेकर तसेच कार्यकारिणी सदस्य नियोजनद्ध मेहनत घेतली. महाडचे अजितकुमार जंगम यांनी या कार्यक्रमप्रसंगी आकार प्रतिष्ठानला उपस्थित राहून आशीर्वाद दिले. पोलादपूर तालुक्यातील सर्व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी या करियर मार्गदर्शन शिबिरास उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घेतल्याने या शिबिराच्या आयोजनाचे यश अधोरेखित झाले.

या वेळी डॉ.शीतल दरेकर तसेच अनेक विद्यार्थी विद्यार्थिनींनी विवेक मेहेत्रेंच्या चला यशस्वी होऊ कार्यक्रमापासून मिळालेल्या प्रेरणेबाबत आपली मनोगते व्यक्त केली.

# आदिवासी आदिशक्ती मेळावा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड आणि पोलादपूर तालुक्यातील आदिवासी कातकरी समाजातील महिला व पुरूषांसाठी वैयक्तीक तसेच सामाजिक विकासासह आदिवासीवाड्यांच्याही विकासासाठी संघटितपणे प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण विभागीय अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांनी व्यक्त केले.



श्रमजिवी जनता सहायक मंडळ आणि सावित्री आदिवासी सहकारी पतसंस्थेतर्फे आदिवासी आदिशक्ती वार्षिक संमेलन मेळाव्याचे आयोजन येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये करण्यात आले असता प्रमुख मार्गदर्शक म्हणून पत्रकार पालकर बोलत होते. या वेळी आदिवासी आधार संघटनेचे अध्यक्ष पांडुरंग वाघे, सावित्री आदिवासी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन सुनिता हिलम, व्यवस्थापक विठ्ठल कोळेकर, व्हाईस चेअरमन कुंदा जगताप, सुरेश हिलम, काशी वाघमारे, वत्सला जगताप, जयराम जाधव, संदीप वाले, सुरेखा जाधव, जना जाधव आदी संचालक तसेच मेघा कदम आदी उपस्थित होते.

आदिवासी समाजातील महिला व तरूणींनी पारंपरिक नृत्य तसेच सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. सुमारे एक हजाराहून अधिक आदिवासी महिला व पुरूष या आदिशक्ती आदिवासी मेळाव्यास उपस्थित राहिले.

# हिरवळ कॉलेजला बी+ मानांकन

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) कडून बी+ मानांकन प्रदान करण्यात आले.

या यशाबद्दल बोलताना प्राचार्य सुदेश कदम यांनी कॉलेजच्या संपूर्ण टीमबद्दल अभिमान आणि कृतज्ञता व्यक्त केली. ही कामगिरी आम्हाला भविष्यातील संधी आणि उच्च दर्जा प्राप्त करण्यास प्रोत्साहित करेल, असे मत त्यांनी मांडले. ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी, नॅककडून बी+ मानांकन हा आमच्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी या सर्वांचे मनापासून आभार मानले.

ट्रस्टच्या संचालिका सोनाली धारिया यांनी हे मूल्यांकन शैक्षणिक उत्कृष्टतेचे सर्वांगीण शिक्षण देण्याच्या प्रयत्नांची पोचपावती आहे, असे मत व्यक्त केले. मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनीही आम्ही केलेल्या प्रयत्नांची दखल आहे असे मत व्यक्त केले. आयक्यूएसी समन्वयक ज्योती पुजारी यांनीही आनंद व्यक्त केला.



# कर्जतकरांकडून ‘जीवनवाहिनी’चे पूजन



**कर्जत : प्रतिनिधी**

दररोज इच्छितस्थळी वेळेवर व न चुकता पोहचविणाऱ्या प्रवाशांची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकल गाड्यांची पूजा दसऱ्याच्या आदल्या दिवशी गेल्या अनेक वर्षांपासून कर्जतकर दसऱ्याच्या निमित्ताने करतात.

कर्जतहून सुटणाऱ्या बहुतांश लोकल गाड्यांची पूजा त्या-त्या गाडीने जाणाऱ्या प्रवाशांनी अगदी मनोभावे करून आपल्या जीवनवाहिनीबद्दल आदर व्यक्त केला.

या वेळी विनोद देशमुख, राजेश करूंक, दत्ता शेकडे, सूरज तरे, नितीन मोरे, कैलास शेलार, निलेश बार्शी, महिंद्रा तवले, राजेश कर्णूक, भूषण कराळे, सर्वेश काबेरे, प्रल्हाद पावसे, संदीप पिगळे, अभिनव चव्हाण, मनोज बागले, मयुरेश थत्ते, दीपक बोराडे, अजय किर्डावकर, मंजिरी कर्वे, मनस्वी बडेकर, अनुजा बागेतकर, निलेश मराडे, सुधीर हडप आदी उपस्थित होते.

# राज्य अजिंक्यपद लाठी स्पर्धेत अलिबागच्या खेळाडूंची चमक

**अलिबाग : प्रतिनिधी**

धुळे येथे झालेल्या पाचव्या राज्य अजिंक्यपद लाठी स्पर्धेत अलिबागच्या खेळाडूंनी २९ सुवर्ण, सात रौप्य व एक कांस्य अशा एकूण ३७ पदकांची कमाई केली. यासोबतच अलिबागने स्पर्धेत चौथा क्रमांक मिळवला.




या स्पर्धेत के.एस. नमिता नाईक इंग्लिश मीडियम स्कूलची रुद्रा विनय पिंळणकर हिने तीन सुवर्ण व एक रौप्यपदक मिळवले. लहान गटामध्ये तिला उत्कृष्ट लाठी खेळाडू म्हणून ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. शिवम संदेश गुंजाळ याने दोन सुवर्ण व एक रौप्यपदक जिंकून मुलांमध्ये उत्कृष्ट लाठी खेळाडू म्हणून ट्रॉफी मिळवली. त्यालाही मान्यवरांच्या हस्ते या वेळी गौरविण्यात आले.

सेंट मेरी स्कूलची सई उदय ठाकूर तीन सुवर्ण एक रौप्य, मंथन वैभव कदम, वैभव कदम यांनी प्रत्येकी तीन सुवर्ण, हार्दिक अस्मिता अकोलकर, स्वरा मोकल प्रत्येकी दोन सुवर्णपदक; के ळकर विद्यालयाची शिवदेवजी हिला तीन सुवर्ण, श्लोक अतुल जाधव दोन सुवर्ण व एक रौप्य, सिमरन संतोष ठाकूर, ऋचा पाटील प्रत्येकी दोन सुवर्ण, अर्णव संजय पाटील, प्रज्वल नवनाथ येडवे प्रत्येकी सुवर्ण व रौप्य आणि अनन्या वैभव निकमने रौप्यपदक जिंकले.

सर्व खेळाडूंना आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक प्रियंका गुंजाळ, वेदांत सुर्वे, माही खबीस यांचे मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंचे लाठी असोसिएशन अलिबागचे अध्यक्ष प्रमोद मसाल यांनी अभिनंदन केले.

## वरसोली विठ्ठल मंदिरात दत्तयाग

**अलिबाग : प्रतिनिधी**

वरसोली येथील श्री क्षेत्र विठोबा देवस्थान समितीच्या वतीने श्री विठोबा रखुमाई मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेचा १६वा वर्धापन दिन शुक्रवारी (दि. १८) साजरा करण्यात येणार आहे.यानिमित्ताने विविध कार्यक्रम होणार आहेत.

पहाटे ५.३० वाजता काकडआरती, सकाळी ६ वाजता महाभिषेक, ९.३० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत श्री दत्तयाग आयोजिण्यात आला आहे. याचे यजमान श्री व सौ घरत, तर पौरोहित्य वेदमूर्ती ब्रह्मेश धर्माधिकारी असतील. दुपारी १ वा. महाप्रसाद देण्यात येईल. सायंकाळी ५ वाजता देहेन येथील माऊली हरिपाठ मंडळातर्फे ह.भ.प. विद्याधर निळकर हरिपाठ सांगणार आहेत. त्यांना महादेव म्हात्रे, अक्षय निळकर पखवाज साथ करतील. या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन देवस्थानचे प्रमुख विश्वस्त रमेश नाईक यांनी केले आहे.

# महिला विकास केंद्रात प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या नवदुर्गांचा सन्मान




**कर्जत : प्रतिनिधी**

नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्ट आणि सिल फाउंडेशन यांच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या महिला विकास केंद्रामध्ये प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या नवदुर्गांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या वेळी नेरळ सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे, माजी उपसरपंच मंगेश म्हसकर, श्रीसाई ट्रस्टचे अध्यक्ष गणेश अय्यर, संचालिका राधिका घुले, शिक्षण विभागाचे केंद्रप्रमुख दिलीप घुले आदी उपस्थित होते.

महिला विकास केंद्रात शिवणकला, ब्युटिशियन आणि आरी कलाकुसर हे कोर्स पूर्ण करणाऱ्या महिलांना प्रमाणपत्र देण्यात आली. मार्गदर्शन करताना पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी, महिला आणि मुलींनी पोलीस दादा आणि पोलीस ताई हे सदैव आपल्या सेवेत आहेत. पोलीस सैदेव महिला सुरक्षेसाठी सेवेत आहेत, मात्र तरीदेखील कोणी टवाळखोर तुम्हाला त्रास देत असेल तर स्वतः पोलीस ठाण्यात या. त्या टवाळखोर तरुणांचा पोलीस बंदोबस्त करतील, असे आश्वासन महिलांना दिले.

## पाली येथील अंबे मातेचे भाविकांनी घेतले दर्शन

**पाली : प्रतिनिधी**


रायगड जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या उत्साही आणि भक्तिमय वातावरणात नवरात्रोत्सव साजरा होत आहे. अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या सुधागड तालुक्यातील पाली येथील प्रसिद्ध श्री अंबे माता मंदिरात सलग धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यंदाही उत्सव मोठ्या उत्साहात होत आहे.

या मंदिरास आकर्षक रोषणाई व फुलांनी सजावट केली आहे. मंदिरात देवीची मोठ्या भक्तीभावाने आरती केली जाते. येथे घटस्थापनेपासून नवरात्रोत्सवाची मोठी धूम पहावयास मिळाली. या ठिकाणी विविध सांस्कृतिक स्पर्धा, क्रीडा स्पर्धा व नावीन्यपूर्ण कार्यक्रम आयोजित केले गेले, ज्यास प्रतिसाद लाभला. त्याचप्रमाणे भाविकांना दैनंदिन महाप्रसादही देण्यात आला.

# कर्जतच्या भिसेगावची श्री अंबे भवानी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वेस्थानकापासून अगदी दोन-तीन मिनिटांच्या अंतरावर असलेल्या भिसेगावमध्ये श्री अंबे भवानी मातेचे मंदिर आहे. नवसाला पावणारी देवी व जागृत देवस्थान अशी या स्थळाची प्रचिती आहे.



या देवीबद्दल उपलब्ध असलेली माहिती अशी की, कर्जत नगर परिषद हद्दीत असलेले भिसेगाव हे गाव भिसे खिंडीच्या पायथ्याशी आहे. पूर्वी या ठिकाणी खूप जंगल होते. व्यापारीवर्ग व्यापारासाठी मुंबई-पुण्याकडे जाताना याच खिंडीच्या मार्गाने जात. हे व्यापारी खिंडीजवळ असणाऱ्या विहिरीजवळ रात्री मुक्काम करून सकाळी पुढील प्रवासाला निघत. डोंगर माथ्यावर आदिवासी लोकांची वस्ती होती. या देवीबद्दल अख्यायिका अशी आहे की, एके दिवशी एका गुजराती व्यापाऱ्याला मुक्कामाला असताना स्वप्न पडले. स्वप्नात देवीने दर्शन दिले व मी या विहिरीजवळ असलेल्या वारुळात आहे. मला त्यातून बाहेर काढ. माझ्या सोबतीला एक काळा नाग आहे. तो तुम्हाला काही करणार नाही, असे म्हटले. स्वप्नाकडे लक्ष न देता तो व्यापारी तेथून पुढे निघून गेला. काही दिवसांनी पुन्हा या ठिकाणी तो मुक्कामास आला असता त्याला तसाच दृष्टांत झाला. हा सर्व वृत्तांत त्याने आपल्या व्यापारी मित्रांना सांगितला.

सर्व व्यापाऱ्यांनी मिळून डोंगर माथ्यावर राहणाऱ्या आदिवासींना मदतीला बोलून घेतले व सर्वजण वारूळ फोडण्यासाठी जमले असता त्या वारूळातून काळा नाग बाहेर आला, परंतु कुणालाही काहीही न करता बाहेर निघून गेला. त्यानंतर आदिवासी लोकांनी वारूळ फोडले. तो काय आश्चर्य खरोखर देवीची सुंदर रेखीव मूर्ती त्यात होती.

ती मूर्ती पाहून सर्वांना आनंद झाला. आदिवासी व व्यापाऱ्यांनी सावली म्हणून देवीच्या डोक्यावर छप्पर तयार केले. तव्हापासून व्यापारी येता जाताना देवीची पूजा करून दर्शन घेऊन आपापल्या कामाला जातात.

ही देवी कोणती? असा प्रश्न कुतुहलापोटी लोकांमध्ये निर्माण होऊ लागला. तेव्हा ज्या आदिवासी माणसाने वारुळास प्रथम हात लावला व त्याच्या स्वप्नात जाऊन देवीने सांगितले की, मी गुजरतमधील अबुच्या पहाडावरील श्री अंबे भवानी आहे. तेव्हापासून या देवीला श्री अंबे भवानी माता असे लोक म्हणू लागले आणि भक्तीभावाने तिच्या भजनी पूजनी लागले. ग्रामस्थांनी एकत्र येऊन मंदिराचा जीर्णोद्धार केला असून आता मोठा सभामंडप उभारून गोरगरीब लोकांच्या शुभकार्याची व्यवस्था केली आहे.

# वाशी येथील जागृत देवस्थान जगदंबा देवी

**पेण : प्रतिनिधी**

एकविरेची बहीण अंबामाताचे मंदिर वाशी तालुका पेण येथे आहे. या देवीला दरवर्षी चैत्र शुद्ध त्रयोदशीला एकवीरा देवीच्या कार्ला येथून दरवर्षी तेलवण म्हणजेच तेल येते.

ही देवी रंजले-गांजले या लोकांच्या हाकेला धावणारी आहे ही प्रचिती कानपाटील आळीतील मंगलदास पदमजी पाटील यांना आली होती. १७ जुलै १९४७च्या शनिवारी रामदास बोट ७०० प्रवाशांना गटारी अमावस्येच्या दिवशी काशाच्या खडकाजवळ बुडाली. त्यात देवी जगदंबेच्या कृपेने लालू मामा उर्फ मंगलदास सुखरूप वाचले. गावकऱ्यांनी मामाची पालखी मिरवणूक काढली होती. देवीची मूर्ती पूर्वाभिमुख चार फूट पाषाणाची आहे. समोरच १२ एकराचा विस्तार तलाव आहे.

वाशी हे तसे देवळांचे गाव. यातील एका आळीला देऊळ आळी म्हटले जाते. एवढी मंदिरे या विभागात कुठेही नाहीत. जवळच विठ्ठल मंदिर, पादुका मंदिर, शंकर, एकविरा, बहिरीदेव, गावदेवी मंदिर अशी अनेक मंदिरे आहेत. देवळासमोर दीपमाळा बांधलेली आहे. या मंदिराचे सहा वर्षांपूर्वी दानशूंच्या सहकार्याने नवीन भव्य व विस्तीर्ण मंदिर उभे केले गेले. या गावाची रचना त्या वेळच्या जाणकारांनी करून ठेवली आहे. त्यांच्या दूरदृष्टीने या गावाच्या कुठल्याही टोकाला रुंद रस्त्यांमुळे विक्रम धावू शकते गटारांच्या चांगल्या व्यवस्थेमुळे पाणी कुठेही साचत नाही रस्त्यावर घाण वगैरे कचरा नसतो. परिसर सुंदर स्वच्छ व मनमोहक आहे.

चैत्रात येथे दोन दिवस देवीची यात्रा भरते दरवर्षी नवरात्र तेथे नऊ दिवस उत्साह असतो हा उत्सव पार पडण्यासाठी वाशी, ओढांगी, सरेबाग व पंचक्रोशीतील मंडळींचे सहकार्य लाभते. या नवरात्रोत्सव १३ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे.



































पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांनी ठिकठिकाणच्या नवरात्रोत्सवांना भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. आयोजकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com